मंगळवार, 17 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - 01 • अंक - 258
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

• MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 17 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-01 • ISSUE-258 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### विमान इंधनाच्या किमतीत पाच टक्क्यांनी वाढ



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** विमान इंधनाचे दर पुन्हा एकदा वाढवण्यात आले आहेत. इंडियन ऑइल कॉरपोरेशनने दिलेल्या माहितीनुसार दिल्लीत विमान इंधनाच्या किंमतीत पाच टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. त्याचबरोबर राजधानी दिल्लीत एक किलोमीटर पेट्रोलची किंमत १.२३ लाखांवर पोहोचली आहे. यावर्षात एटीएफने नवव्यांदा इंधनाच्या दरात वाढ केली आहे. या दरम्यान एटीएफची किंमत ६१.७ टक्क्यांपर्यंत वाढली असून पूर्वी ७२ हजार ०६२ प्रतिलिटर होती ती आता वाढून १.२३ लाखांवर पोहोचली आहे. मुंबईत एटीएफची किंमत १ लाख २१ हजार ८४७ रुपये प्रतिलीटर, कोलकातामध्ये १ लाख २७ हजार ८५४ रुपये आणि चेन्नईमध्ये १ लाख २७ हजार २८६ रुपये प्रति लीटर पोहोचली आहे. वाढलेल्या किंमती आजपासून लागू होणार आहे. या आधी १६ मार्च रोजी एटीएफच्या किमतीत १८.३ टक्के वाढ झाली होती आणि १ एप्रिल रोजी २ टक्के वाढ करण्यात आली होती. १६ एप्रिलला यामध्ये ०.२ टक्के इतकी किरकोळ वाढ करण्यात आली होती.

# मान्सून बंगालच्या उपसागरात

## अर्ध्या महाराष्ट्रात मेघगर्जनेसह पावसाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : उत्तर भारतात तापमानाचा पारा वाढत असताना आता दक्षिण भारतात नैऋत्य मोसमी वाऱ्यांचे आगमग होत आहे. अंदमाननंतर आता नैऋत्य मोसमी वारे बंगालच्या उपसागरापर्यंत पोहोचले आहेत. येत्या काही दिवसांत केरळ आणि त्यानंतर महाराष्ट्रातही मान्सून धडकणार आहे. दरम्यान, पुढील ५ दिवस महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मात्र, विदर्भातील काही भागात उन्हाचा तडाखा कायम राहणार असून तापमानाचा पारा चढाच राहणार आहे.**

नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या हालचालीसाठी दक्षिण भारतात पोषक हवामान निर्माण झालं आहे. त्यामुळे संबंधित परिसरात बहुतांशी ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर काही ठिकाणी ढगाळ हवामानाची नोंद करण्यात आली आहे. अंदमान निकोबार बेटांवरील बहुतांशी ठिकाणी नैऋत्य मान्सूनचे आगमन झाल्यानंतर आता दक्षिण बंगालच्या उपसागरात देखील मान्सून धडकला आहे. असे असले तरी अकोला आणि अमरावती जिल्ह्यात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. अकोला जिल्ह्यांत हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. उर्वरित महाराष्ट्रात मात्र उष्णतेची दाहकता कमी झाली असून तापमानाचा पारा किंचित घसरला आहे. पुढील पाच दिवस राज्यात कमी अधिक प्रमाणात हीच स्थिती कायम राहणार असून अनेक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.



### 'या' जिल्ह्यांत कोसळणार सरी

याचा एकंदरीत परिणाम म्हणून पुढील पाच दिवस महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत विजांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान खात्याने आज पुण्यासह सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, बीड, परभणी, नांदेड, वाशिम, हिंगोली, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांना पावसाचा (येलो अलर्ट) इशारा दिला आहे. येत्या काही तासांत याठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

## चर्चेतली बातमी

### स्मृती इराणींच्या दौऱ्यावेळी राष्ट्रवादीचे आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला पुण्यात आलेल्या केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना राष्ट्रवादीच्या विरोधाला सामोरे जावे लागले. स्मृती इराणींच्या दौऱ्यावेळी राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी हॉटेलबाहेर महागाई विरोधात आंदोलन केले. काही कार्यकर्ते तर हॉटेलमध्ये शिरले. मात्र, पुणे पोलिसांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. तसेच, देशातील वाढती महागाई, घरगुती गॅसचे वाढलेले दर यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या भावना केंद्र सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या देखील मंत्री इराणी यांना चूल व बांगड्या भेट देण्यासाठी कार्यक्रमस्थळी पोहोचल्या. एका पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमाता मंत्री स्मृती इराणी पुण्यात आल्या आहेत. हे कळताच कार्यक्रमस्थळी पुणे शहर महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्या पोहोचल्या, आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या विरोधात व स्मृती इराणी यांच्या विरोधात 'हाय, हाय महंगाई मोदीजीने लाई!, जबसे भाजपा सत्ता में है आयी, कमरतोड महंगाई लायी।, क्योंकि गॅस भी कभी सस्ती थी, स्मृती जी याद हैं ना? अशा प्रकारच्या घोषणा मोठ्या प्रमाणात देण्यात आल्या.

# 'काश्मीर सोडा, नाहीतर मरायला तयार व्हा!'

## काश्मिरी पंडितांना दहशतवादी संघटनेची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमध्ये राहणाऱ्या काश्मिरी पंडितांना दहशतवादी संघटनेने धमकी दिली आहे. 'काश्मीर सोडा, नाहीतर मरायला तयार व्हा', अशी धमकी वजा पत्र लष्कर-ए-इस्लाम नावाच्या दहशतवादी संघटनेने दिली आहे. काही दिवासांपूर्वीच राहुल भट्ट या काश्मिरी पंडिताची दहशतवाद्यांनी हत्या केली होती. त्यानंतर आता या धमकीमुळे काश्मिरी पंडितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**सुरक्षा दुप्पट, तिप्पट करा, तरीही तुम्ही मरणार**

लष्कर-ए-इस्लाम या दहशतवादी संघटनेने जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील हवाल ट्रान्झिट निवासस्थानात राहणाऱ्या काश्मिरी पंडितांना धमकी दिली आहे. स्थलांतरित कॉलनीच्या अध्यक्षांना उद्देशून




हे पत्र लिहिण्यात आले आहे. दहशतवादी संघटनेने पाठवलेल्या पत्रात लिहिले आहे की, 'सर्व स्थलांतरित आणि आरएसएस एजंट यांनी काश्मिर सोडून जावे, अन्यथा मरायला तयार व्हा. काश्मीरमध्ये आणखी एक इस्त्राईल करून काश्मिरी मुस्लिमांची हत्या करण्याची इच्छा असलेल्या काश्मिरी पंडितांना इथे जागा नाही. तुमची सुरक्षा दुप्पट, तिप्पट केली, तरीही तुम्ही मरणार' अशी धमकी देण्यात आली आहे.

**दहशतवाद्यांकडून एका काश्मिरी पंडिताची हत्या**

काही दिवसांपूर्वीच एका दहशतवादी संघटनेने राहुल भट्ट नावाच्या काश्मिरी पंडितावर गोळ्या झाडून हत्या केली होती. राहुल सरकारी कार्यालयात काम करत होता. आणि दहशतवाद्यांनी सरकारी कार्यालयातच घसून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. राहुल यांच्या हत्येनंतर काश्मिरी पंडित आक्रमक झाले होते. रस्त्यावर उतरत काश्मिरी पंडितांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली होती. तसेच काश्मीरमध्ये पंडित सुरक्षित नसल्याचा आरोपही लावला होता.

# संभाजीराजेंच्या राज्यसभा उमेदवारीला राष्ट्रवादीचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी संभाजीराजे छत्रपती यांच्या राज्यसभेच्या उमेदवारीला पाठिंबा जाहीर केला आहे. आमचा एक उमेदवार निवडून येण्यासाठी आवश्यक असलेल्या मतांचा कोटा पूर्ण झाल्यावर राहिलेली मत त्यांना देऊ असे शरद पवार म्हणाले आहेत. संभाजीराजे छत्रपती यांनी राज्यसभेवरील राष्ट्रपती नियुक्त खासदारकीची मुदत संपल्यानंतर पत्रकार परिषद घेत नवी राजकीय भूमिका जाहीर केली होती. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ६ जागांची जून महिन्यात होणार आहे. या निवडणुकीत संख्याबळानुसार भाजपचे २, शिवसेना, राष्ट्रवादी, आणि काँग्रेसचा एक उमेदवार विजयी होईल. सहाव्या जागेवर मला पाठिंबा द्यावा, असे आवाहन संभाजीराजे छत्रपती यांनी केले होते. संभाजीराजे छत्रपती यांना रायगड जिल्ह्यातील अपक्ष आमदाराने देखील पाठिंबा जाहीर केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आमचा एक प्रतिनिधी निवडून येण्यास अडचण नाही. संभाजीराजेंना उरलेली मत देण्यात येतील, असे पवार यांनी म्हटले आहे. शरद पवार यांनी पाठिंबा दिल्यानंतर इतर पक्ष काय भूमिका घेणार हे पाहावे लागणार आहे. आज रायगड जिल्ह्यातील उरणचे अपक्ष आमदार महेश बालदी यांनी संभाजीराजे छत्रपती यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे.

# येथे कचरा टाकू नका...!!

## प्लॅस्टिक ठरतंय मृत्यूचं कारण...

आधुनिक केसरी न्यूज

'येथे कचरा टाकु नका' अशा लिखाणाचे अनेक फलक आपल्याला लावलेले दिसुन येतात. त्यावर दंडात्मक कारवाईचा उल्लेख देखील असतो. मात्र त्याचा परीणाम तसा आढळत नाही. वापर करा आणि फेकुन द्या या संकल्पनेचा दिवसेंदिवस होत गेलेल्या मानवी बदलात, स्वार्थपणाची जास्तच भर पडली आहे, असेच आढळून येत आहे.

प्लॅस्टिक वापरावर बंदी असून सुद्धा त्याची निर्मिती कशी होते हे एक कोडेच आहे ? सर्रासपणे प्लॅस्टिकचा वापर केला जातो हि खरी शोकांतिका आहे. सार्वजनिक ठिकाणी, रस्त्याच्या कडेला नाल्यांमध्ये, नदींमध्ये एखाद्या भिंतीच्या कडेला बेवारसपणे लोक कचरा टाकुन देत आहेत. कुठल्याही प्रकारची भीती, त्यापासून उद्भवणाऱ्या परिणामाचे गांभीर्य त्यांना नाही. प्लॅस्टिकच्या पिशवीत घरातील उरलेले अन्न, टाकाऊ भाजीपाला असे सर्व एकत्र करून आणुन टाकून जातात. त्याजागी दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य तयार होते. अशाच ठिकाणी मोकळी जनावरे आपली पोट भरत असतात. त्यातील खाण्यायोग्य उरलेले अन्न, टाकाऊ भाजीपाला असे चारा म्हणून खात असताना त्याबरोबर प्लॅस्टिक देखील पोटात जात असते. प्लॅस्टिकचे पचन होत नसल्याने त्याचा तसाच साठा पचनसंस्थेत होत असतो. याचा परिणाम लगेच जाणवत नाही. कालांतराने गुरांच्या शरीर अवस्थेत बदल जाणवताना दिसून येतो. शरीरात प्लॅस्टिकचे प्रमाण जास्त झाल्याने पचनसंस्थेचे कार्य बंद होते त्यामुळे त्यांना अन्न ग्रहण करणे शक्य होत नाही. श्वास घ्यायला देखील त्रास होत असतो. अनेक ठिकाणी, गायींची याच कारणामुळे शस्त्रक्रिया करण्यात आली होती. यात त्यांच्या पोटात ४० किलो तर कुठे ५५ किलो असे प्लॅस्टिक आढळून आले होते. यामुळे मृत पावलेल्या गुरांची संख्या तर कुठे उपलब्ध नाही परंतु अनेक गायी - गुरे आपल्या पोटात प्लॅस्टिक घेऊन फिरत आहेत. सुंदर शहराची रचना, स्वच्छ संदेशाची ऊपमा, अजुन बरंच काही आपल्याला भावुन जातं. मात्र सर्व सोयी सुविधा उपलब्ध असतांना देखील उघड्यावर कचरा टाकतांना आपल्याला सामाजिक जबाबदारीचे भान मात्र तेवढे ऊरत नाही. स्वताचे घर परीसर, हा निटनेटका टाप-टिप ठेवण्यात इतरांपेक्षा वेगळा ठेवण्यात आपण काहिही उणीवा यात शिल्लक ठेवत नाही. असाच विचार सार्वजनिक बाबतीत का? करत नाही, हा मोठा प्रश्न आहे. अनेक सामाजिक उपक्रमांमार्फत या साठी जनजागृती केली जाते. एखादी शहराने, महापालिकेने सुंदरतेची रचना




आखली आणि त्याद्दष्टीने प्रयत्न देखील करत असले तरीही जन-माणसांतून त्यांना पुर्ण सहकार्य न मिळाल्यामुळे, स्वच्छतेबाबतची उदासिनता कायम आहे. प्लॅस्टिकचे आयुष्य हे माणसाच्या आयुष्यापेक्षा अधिक आहे.

विवेक म्हस्के, ७२१९४७५७९२






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# लावण्याचा गाभा : पं शिवकुमार शर्मा

आधुनिक केसरी

कविवर्य बा भ बोरकरांच्या 'लावण्यरेखा' या कवितेच्या सगळ्याच ओळी कवितेच्या नावाप्रमाणे लावण्यखाणी आहेत. पण परवा परवा पं शिवकुमार शर्मा आपल्यातून गेले आणि मला बोरकरांच्या या कवितेतल्या शेवटच्या दोन ओळी आठवल्या. बोरकर म्हणतात -

**देखणा देहान्त तो जो सागरी सूर्यास्तसा**
**अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा.**

पंडितजी गेले. सुरांचा सूर्य मावळला. संतूरचे सूर निमाले. पण त्यांचं हे जाणं अस्ताचलाला जाणाऱ्या सूर्यासारखं देखणं होतं. पंडितजींचं संगीत जसं निर्मळ आणि सुंदर होतं तसंच त्यांचं व्यक्तिमत्वही. तो एक देखणा राजहंस होता. अंतर्बाह्य सौंदर्य काय असतं हे जाणून घ्यायचं असेल तर अशा व्यक्तींकडे पाहावं. ' अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी...' असं म्हणतात ना ! तेच आतलं सौंदर्य सुरातही प्रतिबिंबित होत होतं अन चेहऱ्यावरही. अशी माणसं म्हणजे ' सत्यम शिवम सुंदरम ' ची उपासक असतात. सौंदर्याची पूजक असतात.

संतूर हा फारसी शब्द. संतूर हे वाद्य सुरुवातीला फक्त काश्मीर पुरतंच सीमित होतं. सुफी पंथीयांच्या संगीताला, गायनाला संतूरची साथ असायची. तेवढ्यापुरतंच ते मर्यादित होतं. पण संतूरला काश्मीरच्या बाहेर काढून त्याला केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात लोकप्रियता मिळवून देण्याचं श्रेय फक्त आणि फक्त शिवकुमारजींचं !

शिवकुमारजींच्या रक्तातच संगीत होतं. वडील बनारस घराण्याचे मोठे गायक आणि कलाकार. सुरुवातीला उत्कृष्ट तबला वाजवणारे पंडितजी नंतर संतूर वादनाकडे वळले ते कायमचेच ! नुकत्याच सहा फेब्रुवारी २०२२ ला लता मंगेशकर गेल्या आणि सूर निमाले आणि आता परवा १० मे रोजी पं शिवकुमारजी गेले आणि संतूर अबोल झाली. मला गानसम्राज्ञी लता मंगेशकर आणि पं शिवकुमार शर्मा यांच्यात काही साम्यस्थळे आढळतात. ती अशी दीनानाथ मंगेशकर यांच्या निधनाच्या वेळी त्यांनी लतादीदींच्या हातात आपली चिजांची वही आणि तंबोरा सोपवला आणि एक फार मोठी जबाबदारी तिच्यावर सोपवली. तिने आपलं आयुष्य गायनकलेसाठीच समर्पित करावं असंच जणू ते सांगत होते. लतादीदींनी आपल्या पित्याने सोपवलेली ही जबाबदारी किती सुंदर पद्धतीने निभावली. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार

आधुनिक केसरी

मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, मानसिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असते. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो? यावर ते अवलंबून असते. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही पण म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया, प्रतिक्रिया अनावधानाने बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय, त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. सतत वाद घालणाऱ्या व्यक्तीला अनेकदा हे कळतच नसते, ती व्यक्ती व्यक्ती वाद-विवाद करत आहे कि, संवाद साधत आहे. विवादाने केवळ अशा व्यक्तीतील वैगुण्य दिसून येते परंतू जर त्याच व्यक्तीने संवाद साधला तर त्या व्यक्तीचे नैपुण्य जगासमोर येते. वैगुण्यामुळे नकारात्मक वातावरण निर्माण होत असते, तर नैपुण्याने सर्वांनाच आनंद प्राप्तीची अनुभूती येत राहते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसे असू शकेल, हे ठरत असते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.



आधुनिक केसरी

**नको येरझारा | इहलोकी ||**

**नाम तुझे घेता | सुखावलो देवा ||**
**आनंदाचा ठेवा | गावला रे ||१||**

**जन्मोजन्मी होतो | दुःखाने ग्रासलो ||**
**नामाने तरलो | गोविंदाच्या ||२||**

**काय पुण्य माझे | आज फळा आले ||**
**हरिधाम झाले | संसारचे ||३||**


**देहाच्या मंदिरी | आत्म्याचा निवास ||**
**भजनी विश्वास | श्वास झाला ||४||**

**थकला हा जीव | आलो रे माहेरा ||**
**नको येरझारा | इहलोकी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# देह हा परमार्थाचे साधन समजावा



आधुनिक केसरी

संतांचे काम तुम्हाला देहबुद्धीपासून सोडविणे हे आहे; तुम्हाला मुलगा देणे, तुमचे दुखणे बरे करणे, म्हणजे विषय देणे हे नव्हे. जो जो परमार्थाला लागावे तो तो देहबुद्धी तिथून ओढण्याचा जास्त जास्त प्रयत्न करते. विद्येची बुद्धी ही देहबुद्धीला धरून आहे; ती मारून आपण शुद्ध केली पाहिजे. याकरिता भगवंताच्या स्मरणासारखा दुसरा उपाय नाही. कुत्रा हा आपल्याला रात्रीच्या पहाऱ्याकरिता उपयोगी पडतो. पण तो कितीही चांगला अणि उपयोगी असला, तरी आपण त्याला पानात जेवायला घेऊन बसत नाही. त्याप्रमाणे देहाचेही आहे. आतल्या खोबऱ्याच्या रक्षणाकरिता ज्याप्रमाणे करवंटी, त्याप्रमाणे देहाला परमार्थाकरिता साधन मानावे. पण मनुष्य 'हा देहच मी आहे' असे मानून व्यवहार करतो. वास्तविक, आपण देहापासून निराळे आहोत असे पदोपदी दाखवित असतो. माझा हात, माझा पाय, माझा डोळा, माझे मन, फार काय माझा जीव असेही म्हणतो; पण वागतो मात्र 'मी तोच आहे' असे समजून. देहाशी संबंध जास्त येईल असेच आपण भगवंताजवळ मागतो. असे न करावे. आपल्या देहावरचे प्रेम कमी होण्यासाठी, दुसऱ्यावर प्रेम करायला लागावे. प्रेम बसायला आपल्याला आपल्यासारखाच देहधारी लागतो. कुत्रे रडत असले तर आपल्याला नाही वाईट वाटत; पण एखादे लहान मूल रडत असले तर वाईट वाटते. देवावर प्रेम करायला, देवाला आपल्यासारखाच देहधारी कल्पावा लागतो. म्हणून, आपले देहावरचे प्रेम कमी व्हायला, देहबुद्धी कमी व्हायला, सगुणमूर्तीचे, सद्गुरूचे ध्यान करावे लागते. ते जसजसे दृढ होत जाईल, तसतसे आपण स्वतःला विसरून जातो; आणि आपण देहाच्या पलिकडे गेलो, म्हणजे सद्गुरूचे खरे स्वरूप हे देहातीत आहे असे प्रत्ययाला येते. देहबुद्धी नष्ट होईल तसतशी सद्गुरूची ओळख होईल. ज्याने देहाभिमान नष्ट केला त्याचा मोठा ज्ञानीसुद्धा हेवा करतो. 'मी देह' म्हणावे, यापलिकडे दुसरे अज्ञान कोणतेही नाही. मी भगवंताचा असून देहाचा म्हणणे यासारखे दुसरे खोटे नाही. प्रपंचात संकटे येतात, तरी पण तो सोडावासा वाटत नाही; याहून भगवंताची माया ती कोणती ? अतिसहवासामुळे देहाचे ममत्व सुटत नाही. परमात्म्याचा सहवास, उदाहरणार्थ, देवाला जाण्याचा वा जप करण्याचा नेम केला, म्हणजे देहाचे ममत्व थोडे कमी होते. देहाच्या सहवासाने आपण देहाचे होतो, नामाच्या सहवासाने आपण परमेश्वराचे होऊ.

**आजचे बोधवचन : भगवंताच्या स्मरणामध्ये देहबुद्धीचे मरण आहे.**

# हिशोब

आधुनिक केसरी

**आपण केलेली कर्मे आपल्याकडे परत येतात आणि ती ही व्याजासह. हाच सृष्टीचा नियम आहे. फक्त धन दौलत संप्पत्ती कमवल्याने वेळ प्रसंगी कामे येईल हा गैर समज आहे. कर्म चांगले असले की ते वेळ प्रसंगी कामी येतात. चागंले कर्म हे अदृश्य डीपाझीट असते .**

अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका व्यक्तीला, रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर होती. रुग्णालयाचे मालक असलेल्या डॉक्टरांनी त्या व्यक्तीला पाहिल्यानंतर, लगेचच ते स्वतः आय.सी.यू. मध्ये त्या रुग्णाची तपासणी करण्यासाठी गेले. दोन-तीन तासांच्या ऑपरेशननंतर डॉक्टर बाहेर आले आणि त्यांनी कर्मचाऱ्यांना सांगितले की, "या रुग्णाला कोणत्याही प्रकारची कमतरता किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची व्यवस्थित काळजी घ्यावी." तसेच त्याच्याकडून उपचाराचे व औषधाचे सुद्धा पैसे घेऊ नयेत, अशा ही सूचना त्यांनी दिल्या.

सुमारे 15 दिवस तो रुग्ण त्या हॉस्पिटलमध्ये होता. जेव्हां तो बरा झाला आणि त्याला हॉस्पिटलमधून सोडण्याचा दिवस आला, तेव्हां त्या पेशंटचे सर्व रिपोर्ट्स व सुमारे अडीच लाख रुपयांचे बिल त्या डॉक्टरांना देण्यात आले जे त्या हॉस्पिटलचे मालक होते.

डॉक्टरांनी हिशोब ठेवणाऱ्या साहेबांना बोलावून सांगितलं.. "या व्यक्तीकडून एक ही पैसा घेऊ नका. आणि असं करा, तुम्ही त्या रुग्णाला माझ्या खोलीत घेऊन या." त्या माणसाला व्हील चेयरवर डॉक्टरांच्या खोलीत नेण्यात आले.

डॉक्टरांनी पेशंटला विचारले- "भाऊ! आपण मला ओळखलंत का?" पेशंट म्हणाला, "मला असं वाटतं मी तुम्हाला कुठेतरी पाहिलंय. पण आठवत नाही!"

डॉक्टर म्हणाले... "तुम्हाला आठवतं का, की चार वर्षांपूर्वी तुम्ही सूर्यास्ताच्या सुमारास, शहरापासून दूर अशा एका जंगलात एक गाडी दुरुस्त केली होतीत? त्या दिवशी मी माझ्या कुटुंबासोबत सहली वरुन परतत असताना, अचानकपणे गाडीतून धूर येऊ लागला आणि गाडी बंद पडली. आम्ही गाडी बाजूला घेवून, ती सुरू करण्याचा प्रयत्न केला, पण गाडी सुरू झाली नाही. हळू हळू अंधार होऊ लागला होता. आजूबाजूला निर्जन जंगल होते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या चेहर्यावर भिती आणि काळजीच्या रेषा उमटल्या होत्या. प्रत्येकजण देवाकडे, काहीतरी मदत मिळावी, यासाठी प्रार्थना करत होते.

काही वेळातच चमत्कार घडला. तुम्ही बाईकवरून येताना आम्हांला दिसलात. आम्ही सर्वांनी, दयेच्या भावनेने हात वर केले आणि तुम्हाला थांबण्याचा इशारा केला. तुम्ही बाईक उभी केलीत व आमच्या त्रासाचे कारण विचारलेत. गाडीचे बोनेट उघडून तुम्ही काही तपासणी केलीत आणि काही क्षणातच गाडी सुरू झाली. आमच्या सर्वांचा जीव भांड्यात पडला आणि आमच्या चेहऱ्यावर आनंदाची लाट पसरली. आम्हाला वाटले, की देवानीच तुम्हाला आमच्या मदतीसाठी पाठविले असावे, कारण त्या निर्जन जंगलात रात्र घालवावी लागणार, ह्या विचारानेच आमच्या अंगावर भितीने शहारे येत होते. तेव्हा तुम्ही मला सांगितले होते, की तुम्ही एक गॅरेज चालवता. मी तुमचे आभार मानले आणि म्हणालो, की पैसे असूनही अशा कठीण प्रसंगी मदत मिळत नाही. अशा कठीण परिस्थितीत तुम्ही आम्हाला केलेल्या मदतीला तोड नाही, ती अमूल्य आहे. पण तरीही मी तुम्हाला विचारतो की "मी तुम्हाला किती पैसे देऊ?"

त्यावेळी तुम्ही माझ्यासमोर हात जोडून जे शब्द उच्चारलेत, ते शब्द माझ्या आयुष्याची प्रेरणा बनले आहेत. तुम्ही म्हणालात की, "माझा नियम आणि तत्व हे आहे, की मी संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या मदतीच्या बदल्यात कधीही काहीही घेत नाही. माझा देव माझ्या ह्या कर्माचा हिशोब ठेवत आहे." त्या दिवशी मला जाणवले, की आर्थिक परिस्थिती सामान्य असलेली व्यक्ती, जर असे उच्च विचार आणि अशा मूल्यांचे दृढनिश्चयाने अनुसरण करू शकते, तर मी का नाही? आणि ह्याच संकल्पाचा मी ही माझ्या आयुष्यात पाठपुरावा करत आहे. चार वर्ष झाली आहेत, माझ्या अपेक्षेपेक्षाही मला जास्त मिळत आहे आणि कधीच काहीही कमी पडलेले नाही.

हे रुग्णालय माझे आहे. तुम्ही येथे माझे पाहुणे आहात आणि तुमच्या नियमानुसार मी तुमच्याकडून काहीही घेऊ शकत नाही." अशा प्रेरणादायी व्यक्तीची सेवा करण्याची संधी मला मिळाली, ही देवाचीच कृपा आहे. तुमच्या देवाने तुमच्या चांगल्या कर्मांचा हिशोब ठेवला आणि आज तो हिशेब चुकता झाला. माझा देव ही माझ्या कर्मांचा हिशोब ठेवेल आणि जेव्हा जेव्हा मला त्याची आवश्यकता असेल, तेव्हा त्याची परतफेड त्यातूनच होईल." डॉक्टर त्या रुग्णाला म्हणाले.

"तुम्ही निर्धास्त मनाने घरी जा आणि जेव्हा कधी अडचण आली, तर तेव्हा तुम्ही संकोच न बाळगता माझ्याकडे येऊ शकता." त्या खोलीमधून बाहेर पडताना, त्या व्यक्तीने खोलीत ठेवलेल्या परमेश्वराच्या फोटो समोर हात जोडले आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले व हृदय प्रेमाने भरून आले.

आपण केलेली कर्मे आपल्याकडे परत येतात आणि ती ही व्याजासह. हाच सृष्टीचा नियम आहे. फक्त धन दौलत संप्पत्ती कमवल्याने वेळ प्रसंगी कामे येईल हा गैर समज आहे. कर्म चांगले असले की ते वेळ प्रसंगी कामी येतात. चागंले कर्म हे अदृश्य डीपाझीट असते .

# फडणवीसांच्या नेतृत्वात औरंगाबाद मनपावर हंडामोर्चा

## औरंगाबाद शहराला ६ ते ८ दिवसाआड पाणी पुरवठा; केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील पाणी पुरवठा प्रश्नी येत्या २३ मे रोजी औरंगाबादेत विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने महानगरपालिकेवर हंडामोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी दिली. यावेळी माध्यम प्रतिनिधींनी औरंगजेबाच्या कबरीच्या भेटी विषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना एमआयएम नेते अकबरुद्दीन ओवैसी आणि खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी कराड यांनी केली आहे.



मनपाच्या वतीने औरंगाबाद शहराला ६ ते ८ दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो. उन्हाळ्यात ही परिस्थिती अजूनच भयंकर होत चालली आहे. त्यामुळे शहरवासी मेटाकुटीला आले असल्याचे चित्र सध्या औरंगाबादेत पाहायला मिळत आहे.

पालकमंत्री सुभाष देसाई यांनी काही दिवसांपूर्वीच पाणीपट्टीमध्ये निम्मी कपात केल्याची घोषणा केली असल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, पाणी पुरवठा काही सुरळीत झालेला नाही. याच प्रश्नावरून आता भाजप आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

येत्या २३ मे रोजी शहरातील पाणीप्रश्नी भाजपच्या वतीने पैठण गेट ते मनपा कार्यालय असा हंडामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला माजी मुख्यमंत्री आणि विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असल्याची माहिती औरंगाबादेत आयोजित पत्रकार परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी दिली.

## शेतकऱ्याची आत्महत्या नसून खून : सदाभाऊ खोत

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्ह्यातील हिंगणगाव येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांने आत्महत्या केली नसून हा सरकार आणि व्यवस्थेने केलेला खून आहे, असा गंभीर आरोप शेतकरी नेते तथा माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी केला, ते बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील हिंगणगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची सांत्वनपर भेटीनंतर प्रसिद्धी माध्यमांशी बोलत होते. यावेळी भाजपा आमदार लक्ष्मण पवार हे त्यांच्या समवेत होते.

या भेटीनंतर त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर थेट टीका केली. अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्री आज सभा घेऊन जसा चंद्र आपला मुखडा दाखवतो, तसा आपला मुखडा जनतेला दाखवणार आहेत. लोककल्याणकारी राज्य त्यांना निर्माण करता आला नाही. हे सरकार शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करत आहेत. मयत नामदेव जाधव यांची आत्महत्या नसून सरकारने आणि व्यवस्थेने केलेला खून असल्याच यावेळी सांगून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्यावर 302 चा गुन्हा दाखल करा, अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली आहे. एवढेच नाहीतर ऊस उत्पादक शेतकऱ्यास प्रती हेक्टरी एक लाख रूपयाची तातडीची मदत करावी असेही त्यांनी यावेळेस सांगून सरकारने जर मदत केली नाहीतर आम्ही सरकारला देण्यास भाग पाडू असा इशाराही दिला.

## सावळदबारा येथे सोयाबीन बी उगम प्रक्रिया चाचणी प्रात्यक्षिक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे यावर्षी सुदा शेतकरी राजाच्या पेरणीची तयारी लगबग सुरू झाली आहे. त्यासाठी विविध प्रकारचे बियाणे, खते यांच्या वाढत्या किंमतीमुळे शेतकरी हैराण आहे. तेव्हा सोयगाव कृषी विभागाच्या माध्यमातून घरगुती बियाणे वापरावे यासाठी उगम क्षमता चाचणी घेण्यात आल्या. त्यासाठी सोयाबीन बियाणे उगम चाचणी प्रात्यक्षिक करण्यात आले तेव्हा 335 व फुले संगम बियाणे यांच्या बियांवर चाचणी घेण्यात आली.

शिवापा पंधाडे यांच्या घरील बियाणे आणून 10 सोयाबीन बी घेऊन व त्यांचे 100 दाणे 10 सरळ व उभ्या रेषेत धरून घरातील पोत्यावर घेहून त्यावर हळूहळू पाणी 3 वेळेस शिंपडावे व 4 दिवसानंतर पाहावे व 70 टक्के उगम झालेलं बियाणे वापरावे व एकरी 30 किलो बियाणे वापरावे जेणेकरून सोयाबिन उत्पन्न चांगले होऊ शकते, अशी माहिती कृषी सहाय्यक मानसिंग घोडे व अर्जुन सुरडकर यांनी आज सावळदबारा येथे सिद्धीविनायक कृषी सेवा केंद्र, साई कृषी केंद्र सावळदबारा अंशु ठाकूर यांच्या विद्यमाने व ग्रामपंचायत सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने



घेण्यात आली. यावेळेस गावातील शेतकरी बंधू हजर होते. राहुल टीकारे, ईश्वर काळे, समूह सहा मनोज बुढाळ, शिवापा पंधाडे, रहीम खान, जीवन कोलते, मयूर महाजन, अंकुश राठोड, पत्रकार बंधू रहीम पठाण, लोकशाही मराठी पत्रकार संघाचे ता.अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत, जबाबर तडवी व गावकरी मित्र मंडळ हजर होते.

## सुंबेवाडी येथे नदी खोलीकरण व रूंदीकरणास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** तालुक्यातील सुंबेवाडी येथे आयसीआयसीआय फाऊंडेशन व सुंबेवाडी ग्रामपंचायत यांच्या अंतर्गत दि.१४ शनिवारपासून नदी खोलीकरण व रूंदीकरण कामाला सुरूवात झाली.

आष्टी तालुक्यातील १६ गावांमध्ये असे काम फाउंडेशन च्या वतीने चालू आहे. या कामातून गावातील विहीरी, बोअरवेल व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. यामुळे जवळपास १०० एकर ते १५० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. फांउडेशन मार्फत विविध प्रकारचे प्रशिक्षण शेती, दूध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, शेतकऱ्यांमधून उद्योजक तयार करण्यासाठी प्रशिक्षण शेतीवर्ग व महिला वर्गाला प्रशिक्षण देण्याचे काम करते या सोबतच पर्यावरण व जलसंवर्धन प्रकल्पाअंतर्गत शनिवारी कामाचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रमासाठी आयसीआयसीआय फाउंडेशनचे डेवलपमेंट ऑफिसवर चेतन पाटोळे, आष्टी समन्वयक बाळासाहेब कांबळे, भाऊसाहेब घुले (रा.युवक ता. अध्यक्ष), महादेव डोके (सरपंच), सुभाष वाळके, बाबासाहेब भिटे, विजय गायकवाड (सरपंच), सुंबेवाडीचे सरपंच योगेश शेळके, उपसरपंच अशोक गागरे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष वाळके, अनिल शेळके, युवराज शेंडगे व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.










# नाटो प्रमुखांचा दावा

आधुनिक केसरी

युक्रेन आणि रशियामध्ये गेल्या २ महिन्यांपेक्षा जास्त काळ युद्ध सुरु आहे. या युद्धात दोन्ही देशाचे नुकसान झाले आहे. मात्र, युक्रेनचे जास्त नुकसान झाले आहे. युक्रेनमधील अनेक शहरे या युद्धात उद्ध्वस्त झाली आहेत. तर दुसरीकडे नाटो प्रमुखांनी या युद्धाबाबत मोठा दावा केला आहे. नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशनचे (नाटो) प्रमुख जेन्स स्टोलटेनबर्ग यांनी दावा केला की, युक्रेन रशियासोबत युद्ध जिंकू शकते. बर्लिनमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या बैठकीदरम्यान स्टोलटेनबर्ग यांनी हा दावा केला आहे. तसेच नाटो देशांनी युक्रेनला लष्करी मदत पाठवावी असे आवाहनही प्रमुखांनी केले आहे. युक्रेनचे नागरिक आपल्या देशाचे रक्षण करत आहेत. युक्रेन हे युद्ध जिंकू शकते, आपल्याला युक्रेनला पाठिंबा द्यायला हवा, असेही स्टोलटेनबर्ग म्हणाले. फिनलँड नाटोमध्ये सामील होण्यात तयार असल्याचेही स्टोलटेनबर्ग म्हणाले. फिनलँडच्या सदस्यत्वामुळे नाटोची सामायिक सुरक्षा वाढेल आणि नाटोचे दरवाचे सगळ्यांसाठी उघडे असल्याचा एक संदेश पोहोचेल असेही ते म्हणाले. युक्रेन आणि रशियामध्ये सुरु असलेल्या युद्धाबाबत स्टोलटेबर्ग म्हणाले, की रशियाने युक्रेनची राजधानी कीव ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात ते अपयशी झाले. आता रशिया खार्किमधून माघार घेत आहे. तसेच डॉनवासमधील आक्रमणही रशियाने थांबवले असल्याचे नाटो प्रमुखांनी सांगितले. यावर स्टोल्टनबर्ग म्हणाले की, फिनलंडने नाटोमध्ये सामील होण्यास तयार असल्याचे जाहीर केले आहे. ते म्हणाले की फिनलंडच्या सदस्यत्वामुळे आमची सामायिक सुरक्षा वाढेल. तसेच, यातून नाटोचे दरवाजे सर्वांसाठी खुले असल्याचा संदेश जाईल. तसेच जर्मनीचे परराष्ट्र मंत्री अॅनालेना बेरबॉक यांनी युक्रेनला लष्करी मदत करण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले. तसेच जोपर्यंत युक्रेनला समर्थनाची गरज आहे तोपर्यंत नाटो देशांनी पाठिंबा सोडू नये असे आवाहनही बेरबॉक यांनी केले आहे.

# अरविंद केजरीवाल : देशासमोरील धोकादायक व्यक्ती

आधुनिक केसरी



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

**पंजाब निवडणुकांआधीच मी लिहीले होते की पंजाब विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला यश मिळता कामा नये. का कोण जाणे पण जंतरमंतरवरील ते जगप्रसिद्ध झालेले आण्णा हजारेंचे लोकपाल नियुक्तीसाठीचे आंदोलन खूप गाजले होते. त्या आंदोलनात अण्णांचे सोबत, किरण बेदी, योगेंद्र यादव, मनीष शिसोदिया, कुमार विश्वास असे तुलनेने राजकीय क्षेत्राबाहेरील किंवा राजकीय क्षेत्रात नसलेली बरीच तरूण मंडळी प्रकाशात आली. यातील योगेंद्र यादव भरकटले. पोटासाठी काहीही असे वागत राहीले. शेतकरी आंदोलनातही हे महाशय शेतीतील रो की ठो कळत नसतानाही वर्षभर तथाकथित अंदोलनकारी शेतकऱ्यांसोबत राहीले. किरण बेदी भाजप सोबत येऊन राज्यपाल झाल्या, कवी मनाचे, स्वच्छ चारित्र्याचे कुमार विश्वास आपल्या क्षेत्रात परतले. परंतू त्या आंदोलनाचा सर्वात जास्त फायदा घेतला अरविंद केजरीवाल यांनी.**

अरविंद केजरीवाल यांची वेळीच तिरकी चाल ओळखून कुमार विश्वास बाजूला झाले. नव्हे कट्टर टिकाकार झाले. पण अरविंद केजरीवाल यांनी आम आदमी नावाचा राजकीय पक्ष काढला आणि भ्रष्टाचार, प्रचलीत शासन व्यवस्था, राजकारणाचे शुध्दीकरण, नावीन्यपूर्ण योजना, तरूण नवीन टीम आणि अरविंद केजरीवालचा प्रशासकीय अनुभव, शिक्षण याला दिल्लीची जनता भूलली. हे फूकट, ते मोफत, महिलांना या सवलती, स्वच्छ कारभार आदी आश्वासने देत केजरीवाल प्रचंड मताधिक्याने विजय मिळवून सत्तेवर आले.

पहिली पाच वर्षे सरकारी सोयी सुविधा, तामझाम, सुरक्षा लाथाडून वेगळेपणाचा प्रपोगंडा केला.

मुस्लिम मतदार आणि खलिस्थानला नरमाईने पाठिंबा देत पून्हा सत्ता मिळताच यश डोक्यात भिनले. मग सरकारी अलीशान बंगला, भली मोठी अद्ययावत गाडी, सुरक्षा व्यवस्था गुपचूप स्वीकारत सगळे राजकारणी सारखेच हे दाखवून दिले. पंजाब विधानसभा निवडणुकीचा प्रचार चालू असताना मी लिहिले होते की, आप सत्तेवर येणार आहे. परंतु त्यांनी मुख्यमंत्री पदासाठी जाहीर केलेले नाव वादग्रस्त आहे. भगवंतसिंग मान हे एक गुंड प्रवृत्तीचे आणि चरस, गांजा, दारूचे व्यसनाधीन झालेले आहेत. तरूण वयात मोटरसायकल चोरीचे आरोपाखाली त्यांना त्यांच्या तीन मित्रांसह अटक झाली होती. बऱ्याच वेळा दारू नशेत तर्रर होऊन ते मित्रांचे सहाय्याने घरी पोहोचलेले आहेत.

त्यांना फक्त सहा महिन्यांसाठी मुख्यमंत्री केलेले आहे. पूर्ण राज्याचा दर्जा असणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला अधिकार जास्त असतात. दिल्ली केंद्रशासित असल्याने अरविंद केजरीवाल यांची घुसमट होते. त्यामूळे त्यांना पंजाब हातात हवा आहे. एक सरकारी नोकर नोकरी सोडून राजकारणात प्रवेश करतो आणि सभ्यपणाचा आव आणून राज्याचा कारभार चालवताना फूकट सवलती वाटत सुटतो. एकतर तो राज्याचे वाटोळे करतो, कर्जाच्या खाईत राज्याला ढकलतो किंवा मग त्याला फंडस् पुरवणारे दुसरेच कोणी असतात. पंजाबचे बाबतीत खलीस्थानवाद्यांनी त्यांना फंडस् पूरवल्याचा संशय बरेच व्यक्त करत आहेत. पंजाब पोलीस



हाताशी धरून विरोधकांना धमकावण्याचे किंवा टार्गेट करण्याचे प्रयत्न केजरीवाल यांनी चालू केल्याचे दिसत आहे. परंतु त्यांचे दुर्दैवाने केंद्रात प्रचंड बहुमताने निवडूण आलेले खंबीर नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आहे. देशविरोधी कारवाया भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षण मंत्री अजिबात सहन करणारे नाहीत. ते योग्य खमकेपणाने फूटीरांचा बंदोबस्त करण्यासाठी तत्पर असतात. कठोर आहेत आणि देशासाठी वाटेल ते करणारे आहेत. त्यामुळे कोणी कितीही मदत केली तरी अरविंद केजरीवाल फोडाफोडीत कधीच यशस्वी होऊ शकणार नाहीत. दिल्ली केंद्र शासित राज्य असले तरी दोन महानगरपालिका तिथे अस्तित्वात आहेत आणि देशाचे भाग्य की या दोन्ही महानगर पालिका भाजपाच्या ताब्यात आहेत. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांचे हात येथे बांधलेले आहेत. म्हणून ते पंजाबचे मुख्यमंत्री पद मिळवण्याचा अटोकाट प्रयत्न करतील.

मला असे वाटते की दिपावच्या दरम्यान मान यांची उचलबांगडी होईल आणि स्वतः अरविंद केजरीवाल तेथे मुख्यमंत्री होण्याचे प्रयत्न करतील. अरविंद केजरीवाल हे कोणत्यातरी परकीय शक्तीचे हस्तक असावेत असा त्यांच्या विरोधकांसह सहकाऱ्यांना ही संशय आहे. आज भारतीय राजकीय क्षेत्र प्रचंड बदनाम झालेले असून कांही परिवारांचे हातात अनेक राजकीय पक्षांची सुत्रे आहेत. इंदिराजींचे काळापासून राजकारणाने भ्रष्ट मार्ग अंगीकारला असून, देशाभिमान, देशप्रेम लयाला गेलेले आहे. याला राजकारतण्यांएवढेच शिक्षण क्षेत्र जबाबदार आहे. जर प्ले ग्रुपमध्ये प्रवेश घेतल्यापासूनच विद्यार्थ्यांना खरा इतिहास, धार्मिक शिक्षण, सामाजिक जाणिव, आणि देवाप्रती आपली कर्तव्ये यांचे बाळकडू पाजवायला सुरूवात केली तर पुढच्या पिढ्या निश्चित च चांगल्या निपजतील, उपजतील. त्यामुळे सर्वात प्राधान्य शैक्षणिक अभ्यासक्रम ठरवताना उपयूक्त, सुसंस्कारक्षम, आणि खरा, सत्य इतिहास शिकवला जावा. व्यवसायाभिमुख, कमर्शियल शिक्षण दिले जावे. स्वावलंबन शिकवले जावे.

अरविंद केजरीवालसारखी मंडळी फुटीरतावादी विचारांना तर विरोध करत नाहीत परंतू अशा विषयांना बगल देऊन गप्प बसने पसंत करतात. जर भविष्यात सहा आठ महिन्यांनी, वर्षभरात अरविंद केजरीवाल यांनी पंजाबचे मुख्यमंत्री पद मिळवायचा प्रयत्न केला तर तो प्रयत्न हाणून पाडण्याची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे नवज्योतसिंग सिध्दु, भगवंत सिंग मान, आणि खलिस्तानवादी मंडळी जवळ येवू नयेत यावर नजर ठेवावी लागेल. सावध राहावे लागेल. नाही तर एकीकडे जम्मू काश्मीर आणि लढाख मुख्य प्रवाहात येत असताना पंजाब भरकटण्याचा धोका उभा राहू शकतो. जसा भारतातील ब्राह्मण समाज जगभरात आपले बुध्दीमत्तेचे जोरावर स्वतःचे अस्तित्व निर्माण करतात आणि हे करताना ते त्या त्या देशाचे नियम, कायदे पाळत समरस होतात तसे पंजाबी लोकांकडून अपेक्षित आहे.

जगाच्या पाठीवरील जवळपास सर्वच देशात शिख समाज विखुरलेला आहे. आणि बहुतेक ठिकाणी ही मंडळी आर्थिकदृष्ट्या मजबूत आहेत. अतिरिक्त पैसा वाम मार्ग दाखवतो तसे यातील कांही मंडळी वागत आहेत. गुरू नानक आणि गुरु गोविंद सिंग, तेगबहाद्दुर सिंग यांसारख्या लोकांनी, नामदेव महाराजांना गुरूस्थानी माणून जीवन घडवले, उपासना म्हणून गुरूगृंथसाहेब पठणाचा आग्रह धरला. गणपती, शिव म्हणजे महादेव यांचेच हे सगळे भक्त आहेत. पण राजकारण्यांनी अकारण शिख समाजाला हिंदूंपासून वेगळे करण्याचा प्रयत्न चालवला आहे. विजयादशमी शिख समाज अतिशय धार्मिक भावनेने साजरा करतो. ते सर्व हिंदू च आहेत. जैन, शिख, लिंगायत, बौध्द या उपासना पध्दती आहेत वेगळे धर्म नव्हे.

# भारतीय समाज रचना आणि मुसलमान समाज

आधुनिक केसरी

**प्रत्येक मुसलमान अतेरिकी, दहशतवादी नाही, नसतो हे जसे सत्य आहे तसेच हे ही सत्य आहे की प्रत्येक दहशतवादी, अतिरेकी हा मुसलमानच सापडतो. याची मुळ कारणे त्यांचे शिक्षण पध्दत, धार्मिक शिकवण, खानपान यात दडलेली आहेत. सतत मांसाहारी भक्षण, सतत उग्र वैचारीक फतवे, भडकावू संदेश आणि जगावर लोकसंख्येचे बळावर अधिकार गाजवण्याची विचारधारा यामुळे असे घडते. म्हणजे जीवनपध्दतीतच अमुलाग्र बदलअपेक्षित आहेत. परंतू दुर्दैवाने उच्च शिक्षित, सुशिक्षित, समंजस, सामाजिक भान असणारे ही कट्टरता वादापूढे झुकतात किंवा किंबहुना हेच शिक्षित लोक सौम्य भाषेत हेच विष कालवत आपल्या पोळ्या भाजतात, पोट भरतात.**

हो मी एक्स मुस्लिम वरील चर्चा सत्र ऐकले. मुस्लिम धर्मग्रंथ आणि धर्मगुरू यांच्या वैचारिक मतभेदांमुळे समाजाचे घोर नुकसान होत आहे हे स्पष्ट जाणवत होते. कुराण शरीफ ओरिजनल कोणते येथपासूनच सुरूवात करावी लागणार आहे. ओरिजनल कुराण शरीफ हा पवित्र ग्रंथ कांही मुस्लिम धुरीणांनी लपवला आहे. स्वार्थ, राजकीय उचलेगिरी, ओरबाडून घेणे, खाणे, मिळवणे हीच शिकवण बालवयापासूनच दिली जाते. निर्भीडपणा आणि शिरजोरी या गुणांची पेरणी केली जाते पण वापर स्वार्थासाठी होतो फक्त. जोपर्यंत शंभर टक्के मदरसे बंद केले जात नाहीत, आणि मशिदीतील नमाज पठणाचे लाईव्ह प्रसारण करणे बंधनकारक करण्यात येत नाही तोपर्यंत हा माजोरीपणा जपला जाणार आहे. वृध्दिंगत केला जाणार आहे.

मौलवी, मुल्ला, काजी यांच्या नियुक्तीचे निकष सरकारणे फिक्स करायला हवेत. धार्मिक शिक्षण, ज्ञान, सामाजिक जाणिवेतून कार्य करण्याची तयारी आणि द्वेषमूलक शिक्षण न देण्याचे हामीवरच यांच्या नियुक्त्या व्हाव्यात. कोणत्याही मशिद कर्मचाऱ्याला, मुल्ला मौलवींना, मदरस्यातील शिक्षकांना सरकारने पगार, वेतन, अर्थसहाय्य देऊ नये. ते काम वक्फ बोर्डाकडे सोपवावे. सर्व वक्फ बोर्ड आणि त्यांनी देशाचे फाळणीच्या नंतर, म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वाढवलेल्या संपत्ती, भूखंड, बांधकाम, सुरू केलेले प्रोजेक्टस्, उद्योग व्यवसाय या सर्वांची सर्वंकष चौकशी करून अतिरिक्त, बेहिशोबी, अनाधिकृत, लुबाडलेले सर्व जप्त करावे. आणि कठोर नियम लादून सामाजिक समतोल आणि शांतता याला प्राधान्य द्यावे. समान नागरी कायदा त्वरित पास करून, एक पत्नीत्व, लोकसंख्या नियंत्रण कडक आणि कठोरपणे राबवावे तरच हे मुजोर लोक शांतपणे जीवन जगतील इतरांनाही जगू देतील. हे सर्व होणे गरजेचे आहे. तो ही समाज सामाजिक ऐक्याला टरकून राहातो हे अनेक प्रसंगी सिध्द झालेले आहे.

चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स येथील



मुस्लिम समाज वठणीवर आला आहे, येत आहे. त्यामुळे भारत सरकारणे न घाबरता कठोरपणे या उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

मुसलमानांमध्येही अनेक पोटजाती, पंथ, उपासना पध्दती, जीवन पध्दती आहेत. त्यांचेही रोटीबेटी व्यवहार ठराविक पध्दतीनेच होतात. स्त्री ही फक्त उपभोग्य वस्तू आहे. आणि जनन हे तीचे एकमेव कार्य आहे या शिकवणीमुळे समाजात महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोणच वाईट आहे. बहीण भाऊ, मामा, चाचा, चुलतभाऊ, मावस भाऊ या संकल्पनाच त्यांच्यात रुजलेल्या नाहीत. बऱ्याच ठिकाणी भाऊच बहिणीचा उपभोग घेतो, मामाच भाचीला आपल्या हवसची शिकार बनवतो. कारण पवित्र नात्यांपेक्षा स्त्री उपभोग्य आहे हेच बिंबवले जाते की काय असा संशय येतो.

हिंदू धर्मात महिलेला देवी, पूज्य व्यक्ती मानले जाते. वस्तू नाही.

आपण नात्यांचा अदर करतो. पर स्त्री माते समान ही शिकवण रूजवतो. पण तिथे तसे दिसत नाही. कांही सुशिक्षित, समजदार, सामाजिक भान असणारे प्रॅक्टीकल लोक हल्ली बरेच सुधारलेत.

पण परस्पर विसंगत विचार प्रणाली मुळे आणि शिकवणूकीमुळे असंख्य मुसलमान धर्मांतराचे उंबरठ्यावर आहेत. त्यांना थोडी हवा दिली, सहानुभूती दाखवली, विश्वास दिला सन्माननीय जीवनाचा तर मोठ्या प्रमाणात धर्मांतर घडेल.

मुस्लिमेत्तर समाज त्यांना कट्टरवादी समजून दुरावा ठेवतात म्हणून नाईलाजाने ते एक होतात, संघटीत राहतात. धर्माच्या नावाखाली दुराचार, दुष्टावा, वैरभाव, बंडखोर वृत्ती भिनवली जाते परिणामी समाज बदनाम होते. सलमान खुर्शीद (वकील), हमीद अन्सारी (माजी उपराष्ट्रपती) हे त्यातील कांही अग्रणी. एखादाच आरिफ महंमद खान किंवा ते पाकिस्तानी वकील (आत्ता नाव आठवत नाहीये) आपकी अदालत मध्ये दोनचार वेळा ते आले होते. असे सभ्य आढळतात. फतेह आली का काय असेच नाव आहे त्यांचे. रामायण मानणारे, शिकवण जानणारे फार थोडे आहेत.

त्यामुळे जनसंख्या नियंत्रण आणि बहू भार्या पध्दत लगेच बंद करायला हवी. आणि दोन पेक्षा जास्त अपत्ये असणाऱ्यांना नागरिकत्वाचे हक्कांपासून, सवलतींपासून वंचीत ठेवायला हवे. भारत सरकारने एक श्वेत पत्रिका काढून भारतातील आजची मुसलमान लोकसंख्या, शिक्षित नागरीकांची टक्केवारी, आयकर नियमित भरणाऱ्यांची संख्या, आणि एकुण कर उत्पन्नातील त्यांचा टक्का, मुसलमानांना मिळणाऱ्या सवलती, वेतन, पगार, मानधन, अर्थसहाय्य, आदी जाहीर करावे. म्हणजे सर्व जगजाहीर होईल सत्य परिस्थिती.

**पीपीएम, पुणे**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : contact@adhunikkesari.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: contact@adhunikkesari.com, Contact : +91 90757 16739

# जरा ऐकून तर बघा...

## गाण्याचं शिक्षण घेताना : भाग 22



दिनेश संन्यासी
संपर्क क्र. 9611687940

आधुनिक केसरी

**ज्ञानाच्या आधारे एखाद्या महान अशा कलेचा नकळतसुद्धा अपमान करणे कितपत योग्य आहे? कलेच्या बाबतीतच नाही पण अन्य बाबतीतही आपण नकळत असे विनोद करून आपलं अज्ञान सिद्ध तर करतोच, पण नकळत किंवा जाणीवपूर्वक आपण या बाबींचा अपमानदेखील करत असतो किंवा दर्जा घालवत असतो. ज्या भारतीय शास्त्रीय संगीताला जगातील सर्वोच्च संगीत असं मानलं जातं, त्या भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताला भारतीय लोकांनी किमान जाणून किंवा समजूनदेखील न घेणे ही वाईट अवस्था आहे.**

आपल्याकडे एखाद्या गोष्टीवर विनोद झाला की नंतर त्या गोष्टीकडे पुन्हा त्याच नजरेने बघितले जाते; केवळ विनोदापुरता तो मर्यादित भाग राहत नाही. पुढे त्याची प्रतिमाच त्या विनोदाशी संबंधित होत असते. एकदा कॉलेजला मित्र-मैत्रिणींच्या घोळक्यात एक चित्र असलेला कागद पाहून एक विनोद छेडला गेला (तोच विनोद आजही बरेच जण सांगतात) ते चित्र असे होते की, एक शास्त्रीय गायक गात असताना खिडकीतून गाढवं ते ऐकत आहेत, असे ते चित्र होते. यावर सर्वांचा हशा झाल्यानंतर माझ्याकडे बघून त्यातल्या एकाने विचारले, दिनेश तुला या विषयी काय वाटतं? मी सांगितलं की, गाढवांना शास्त्रीय संगीत कळायला लागलं आहे. म्हणून ते ऐकायला आवडीने आलेत. पण तुझ्यासारख्यांचं काय? ज्यांना अजूनही शास्त्रीय कळत नाही. त्यानंतर त्याचा चेहरा पाहण्यासारखा होता. यातला विनोदाचा भाग सोडा; पण ज्ञानाच्या आधारे एखाद्या महान अशा कलेचा नकळतसुद्धा अपमान करणे कितपत योग्य आहे? कलेच्या बाबतीतच नाही पण अन्य बाबतीतही आपण नकळत असे विनोद करून आपलं अज्ञान सिद्ध तर करतोच, पण नकळत किंवा जाणीवपूर्वक आपण या बाबींचा अपमानदेखील करत असतो किंवा दर्जा घालवत असतो. ज्या भारतीय शास्त्रीय संगीताला जगातील सर्वोच्च संगीत असं मानलं जातं, त्या भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताला भारतीय लोकांनी किमान जाणून किंवा समजूनदेखील न घेणे ही वाईट अवस्था आहे. आम्हाला शास्त्रीय संगीत कळतच नाही. त्यात फक्त आआऽऽऽ करत असतात ना! ते समजत नाही. अशी वाक्ये वारंवार ऐकायला मिळतात. सर्वसामान्यांना शास्त्रीय संगीत पटकन समजेल असेही नाही. शेवटी ते शास्त्रीय आहे. त्याला शास्त्र आहे. म्हणून गाणं समजून घेण्यासाठी मन लावून ऐकावं लागेल. पण त्यासाठी किमान ऐकण्याची सुरवात तर करावी लागेल ना! म्हणून ऐकण्याची सुरुवात करणं हा सगळ्यात पहिला भाग झाला. पण मला वैयक्तिक अस वाटतं की, कळायला हवं तरी कशाला? कारण अनेक जण हिंदी मराठी विविध प्रकारची गाणी ऐकतात. त्या गाण्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ सर्वांना कळतोच का? उदा. पंडित भीमसेन जोशींचा माझं माहेर पंढरी हा अभंग ऐकताना त्यातली आलापी, तान, राग इत्यादी बाबी सगळ्यांना कळताच का? पण ऐकताना छान वाटतं ना !! यासोबत इतर भावगीत, सिनेगीत, कव्वाली, गझल इ. ऐकताना कुठला राग, कुठला ताल, कुठल्या शब्दासाठी कोणता स्वर वापरला आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न सामान्य रसिक करतो का? प्रत्येक शब्दाचा अर्थही कळतोच असं नाही. तरीही तो ऐकत असतो. कारण, तो फक्त त्याचा आनंद घेत असतो. मग आनंद घेण्यासाठी कळणं आवश्यक नाही. कळालं तर आनंद द्विगुणित होईल! यातही काही वाद नाही. पण त्यासाठी सर्वच शिकावं असंही काही आवश्यक नाही. जे शिकतात त्यांना ते कळायलाच हवं.

शास्त्रीय संगीत ऐकताना कसं ऐकावं? शब्दप्रधान संगीतात आणि शास्त्रीय गायन वादनात काय फरक आहे? हे थोडक्यात समजून समजून घेऊ. जगातील सर्व संगीत हे भावनाप्रधान आहे. वेगवेगळ्या भावनांची अभिव्यक्ती संगीतातून केली जाते. शब्दप्रधान गायकी म्हणजे सुगम संगीतात एखाद्या भावनेला शब्दातून व्यक्त केलेलं असतं. शब्दातूनच त्याचा विस्तार केलेला असतो. परिणाम साधण्यासाठी स्वरांचा, तालांचा, वेगवेगळ्या वाद्यांचा उपयोग केला जातो व परिणाम सहजगत्या साधला जातो. शास्त्रीय संगीतात ठराविक रागात, म्हणजे विशिष्ट सुरात एक बंदिश गायली जात असते. ज्यात शब्द असतात. जे शब्द



विशिष्ट भावनेला अभिव्यक्त करत असतात. परंतु यात आरोहात आणि अवरोहात लागणाऱ्या स्वरांच्या नियमात राहून, केवळ स्वरांच्या आधारे त्याच भावनेला शब्दातून विस्तारित न करता आकारातून वेगवेगळ्या स्वरसंगतीतून अभिव्यक्त केलं जातं. एकच भावना प्रत्येक सुराच्या आधारे वेगवेगळ्या प्रकारे दिसत असते. म्हणून सर्वसामान्यांना असं वाटत असतं की हे एकच ओळ वारंवार वारंवार गाताहेत. परंतु त्याचं लक्ष फक्त शब्दांकडे असतं. त्याच्या प्रकारांकडे नसतं की गायक प्रत्येक वेळी तीच ओळ वेगळी करून गात असतो. यात फक्त मन लावून ऐकण्याचा अभाव असतो बस. शेकडो वर्षे ही कला गुलामीत राहिलेली आहे. राजदरबारात असलेला गायक केवळ राजाच्या इच्छेसाठी, त्याला खुश करण्यासाठी गायचा. इंग्रजांच्या काळात ही कला खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाली आणि समाजात आली. परंतु समाजाने गाण्याला तुच्छ मानले. त्याला स्वीकारलं नाही. खरं तर ती खरंच दैवी माणसं होती ज्यांनी समाजाचा विरोध पत्करून, कलेची जोपासना केली, संगोपन आणि संवर्धन केले, तेही अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत. याची असंख्य उदाहरणे वाचायला मिळतात. साधारण सत्तर ऐंशीच्या दशकापासून कला आणि कलाकार स्थिरतेकडे जात आहेत. आजच्या काळात वेगवेगळ्या चॅनलवरील स्पर्धांमुळे कलेला खऱ्या अर्थाने चांगले दिवस आले आहेत. अशात केवळ फिल्मी संगीत लवकर येतं, सहज जमतं. असं म्हणून शास्त्रीय संगीत शिकायला आणि समजायला अवघड असते, अशी विधाने करणाऱ्यांची आणि ते ऐकून चुकीचा मार्ग स्वीकारणाऱ्यांची समाजात कमी नाही. त्यात भर म्हणजे आपल्यात गैरसमजांना नेहमीच उधाण आलेलं असतं. आणि समजून घेण्याची सदैव ओहोटी लागलेली असते. शास्त्रीय संगीत शिकवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपलं अभिजात संगीत कसं ऐकलं पाहिजे याचे विद्यार्थ्यांसोबत पालकांनाही धडे द्यायला हवेत. तेव्हाच न कळणाऱ्यांनाही शास्त्रीय गायन व वादन नक्कीच आवडेल यात काही वादच नाही.

# 'प्रायश्चित्त'



मनोज शोभाबाई
प्रकाश अग्रवाल
संपर्क क्र. : 9850678395

आधुनिक केसरी

**एका खाजगी कम्पनीच्या कार्यालयात नीरज आणि सोनाली नोकरी करत होते. दोघेही एकमेकांचे चांगले सहकारी होते. एकमेकांना आदरपूर्वक बोलणे, सुसंवाद साधणे, योग्य वेळी योग्य सहकार्य करणे हे अगदी सहजपणे या दोघांमध्ये घडत होते. दोघांच्या चांगल्या कार्यामुळे कार्यालयात दोघांना योग्य सन्मानही प्राप्त व्हायचा.**

हळूहळू सुसंवाद घडता घडता दोघांमध्ये गमती जमतीच्या विनोदी गप्पा व्हायला लागल्या. दोघेही विनोदी गप्पा करता करता खूप हसायचे. अशा रीतीने दिवस व्यतीत होताना नीरज आणि सोनाली दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले.

नीरज सोनालीकडे ती कामात व्यस्त असताना बघायचा, खूप वेळपर्यंत बोलायचा. दोघेही मनसोक्तपणे गप्पा मारायचे.

ही बाब कार्यालयात असलेल्या इतर सहकाऱ्यांच्या नजरेतून सुटली नाही. नीरज वारंवार इतर सहकारी सोडून सोनालीकडेच बघून बोलायचा. नीरजच्या मनातील भाव सोनालीला खूप चांगल्या रीतीने समजत होते; पण ती एक समजदार स्त्री होती. वास्तविक बाब अशी होती की सोनाली एक विवाहित महिला होती आणि दोन मुलांची आई होती.

नीरजदेखील विवाहित होता आणि त्यालाही दोन मुले होती.

प्रेम ही अशी नैसर्गिक भावना आहे जी वय, जात, धर्म, विवाहित, अविवाहित असं काही पाहत नाही. नीरजला याची जाणीव होती की आपण दोन मुलांचे वडील आहोत आणि एक जबाबदार व्यक्ती आहोत. त्याच्या मनातील प्रेमभावनादेखील त्याला सतावत होती. त्यामुळे सतत तो त्याचे प्रेम व्यक्त करण्यासंदर्भात गोंधळात असायचा. तो स्वतःला म्हणायचा, "छे! छे! आपण जो विचार करतोय, तो चुकीचा विचार आहे. हे केवळ अशक्य आहे." पण त्याचे मन परत त्याला प्रेमविचारकडे घेऊन जायचे. सोनालीदेखील एक समजदार, संयुक्त कुटुंबातील एक जबाबदार स्त्री आणि दोन मुलांची आई होती. तिला स्वतः च्या जबाबदाऱ्या खूप चांगल्या रीतीने समजत होत्या.

आता नीरज दिवस रात्र फक्त सोनालीचाच विचार करायला लागला. तणावात राहायला लागला. घरी आल्यानंतर नीरजची पत्नी मयुरी त्याला विचारायची , "काय विचार करताय? आणि एवढे गंभीर का झालात तुम्ही मागील काही दिवसांपासून?" "नाही, नाही काही नाही. मागील काही दिवसांपासून कार्यालयात खूप काम आहे ना, म्हणून थोडं टेन्शन आलंय." पत्नीला वाटायचं आलं असेल टेन्शन!

असा विचार करून नीरजची पत्नी परत तिच्या कामात व्यस्त व्हायची.

असेच ताणतणावाच्या मनस्थितीत दिवस व्यतीत होताना एके दिवशी नीरजची व्यक्तिगत डायरी त्याच्या हाती लागते. त्या डायरीत त्याने त्याच्या जीवनाविषयी आखलेली ध्येये, उद्दिष्टे तो वाचतो आणि आपसुक त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळतात; कारण तो प्रेमडोहात एवढा बुडालेला असतो की तो त्याच्या रोजच्या साध्या साध्या कामात लक्ष केंद्रित करण्यात अपयशी ठरतो. प्रेमडोहात बुडालेला व्यक्ती जेवढा बाहेर येण्याचा प्रयत्न करतो तेवढा तो अधिक गटांगळ्या खातो. नेमकी हीच अवस्था नीरजची झाली होती. डायरीत लिहिलेली प्रत्येक बाब त्याला त्याच्या ध्येयाची आठवण करून देत होती.या सर्व आठवणी नीरजच्या मनाचा ठाव घेतात.

अचानकपणे त्याच्या मनात सकारात्मक भावना जागृत होते. तो ताडकन उठतो, आरशासमोर उभा राहतो आणि स्वतःकडे पाहतो. आत्मपरीक्षण करतो आणि स्वतःला त्या प्रत्येक बाबीची आठवण करून देतो, जी त्याने जीवनाविषयी ठरवली होती. स्वतःच्या चुकांची स्वतःला जाणीव करून देतो. त्याला वाटते की आपल्यामुळे सोनालीचे मन दुखावले गेले. आपले आणि सोनालीचे खूप चांगले, सहकार्याचे, सुसंवादी नाते अपमानित झाले. नीरजला वाटते की आपण दोन मुलांचे



जबाबदार वडील असताना असे वागणे अत्यंत चुकीचे होते. आपण ध्येयमार्गावरून कधी विचलित झालो हे आपल्याला कळलेही नाही. त्याला खूप पश्चाताप होतो. त्याच्या मनात आत्महत्येचा विचार येतो. त्याला वाटते आपल्यामुळे सोनाली प्रत्यक्ष,

अप्रत्यक्षपणे दुखावली गेली; पण तो मनाला हेही समजावतो की यावर आत्महत्या हा उपाय नाही; कारण आपल्या मागे आपल्या पत्नीच, दोन मुलांचं काय होईल!

नीरज 'प्रायश्चित्त' करण्याचे ठरवतो. आता येथून पुढे आपण सोनालीसोबत इतर बाबतीत संवाद न साधता केवळ कार्यालयीन कामकाजासंदर्भात संवाद साधायचा. योग्य रीतीने सहकार्य करायचे, असे तो ठरवतो. ज्याप्रमाणे तो ठरवतो त्याप्रमाणे तो वागतो. तो सोनालीला पूर्वीप्रमाणे आदरपूर्वक बोलतो. योग्यवेळी, योग्य रीतीने सहकार्य करतो. सोनालीदेखील नीरजसोबत समजूतदारपणे वागते. दोघांचे कार्यालयीन संबंध पूर्ववत होतात. दोघेही पूर्वीप्रमाणे एकमेकांचे चांगले सहकारी होतात. नीरजचे प्रायश्चित्त फळाला येते. तो आधीप्रमाणे त्याच्या ध्येय मार्गावर अधिक प्रभावीपणे वाटचाल करतो.

# नवसंजीवनी देणारा काव्यसंग्रह : 'जीवन संघर्ष'

आधुनिक केसरी

**कवि नवनाथ रणखांबे यांनी कोणताही अभिनिवेशन न बाळगता सर्व कविता कवीच्या लेखणीतून मुक्तछंदात उतरल्या आहेत. सर्जनाच्या पातळीवर एखादा अनुभव अभिव्यक्त करताना कलावंत स्वतःच्या मानसरचनेचे अपरोक्ष प्रकटीकरण करीत असतो. कवीच्या ठायी ठायी असलेले प्रखर सामाजिक भान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी असलेली प्रामाणिक बांधिलकी यामुळे त्यांच्या कवितांना वैचारिक अधिष्ठान लाभले आहे.**

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या क्रांतीने असंख्य मुक्या प्रतिभा बोलू लागल्या. काव्याच्या आकाशात या प्रतिभा निर्भय होऊन उडू लागल्या. या देशात गुलामी सुरू करणाऱ्या दृष्टांवर ज्वालामुखी ओतू लागल्या. हजारो वर्षे मनमानी करणाऱ्या मगुरुर विषमतेचा माज उतरवू लागल्या. देव आणि दैवाची भीती या प्रतिभांनी गाडून टाकली. मनुष्य हाच या जगात परमोच्च आहे, त्यामुळे त्याची अप्रतिष्ठा करणाऱ्या सर्वच यंत्रणांना या आंबेडकरवादी प्रतिभांनी गुन्हेगार ठरविले. ज्या प्रतिभांनी मराठी कवितेत हा निर्णायक संग्राम सुरू केला त्यातले एक नाव म्हणजे कवी 'नवनाथ रणखांबे' होय. 'जीवन संघर्ष' हा पहिलाच काव्य संग्रह घेऊन येत या कवीने मराठी कवितेच्या प्रांतात एक खळबळ उडवली आहे. मुख्यपृष्ठावर राखेतून आकाशी झेप घेणारा फिनिक्स पक्षी कवीच्या जीवनाला नवी उमेद, नवी जिद्द , नवी उभारी आणि नवं संजीवनी देणारा आहे. अर्थात मुखपृष्ठ हे जीवनाला आशावाद देणारे आहे. तसा या कवीचा आणि माझा थोडा उशिरा संपर्क आला. परंतु कवीच्या प्रतिभेने मला दखल घेण्यास भाग पाडले.

डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्वज्ञानातून आंबेडकरी कविता आकारास आल्यामुळे याच विचार परंपरेने मराठी कवितेला संघर्षाची तत्वे आणि लढ्याची हत्यारे प्राप्त करून दिली आहेत. बौद्ध संस्कृती आणि संविधान सांस्कृतिच्या संवर्धनासाठी आंबेडकरी कविच्या कविता हे साधन अत्यंत महत्त्वाचे तर आहेच, पण त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीचा क्रांतिकारी दस्तावेज आहे.

मनुष्य हा विषय केंद्रस्थानी ठेवून सामान्यांवर होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम, पिळवणूक, शोषण, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी जीवनात होत असलेली कोंडी, वा गळचेपी, अवहेलना त्यांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य, समस्या अशा अनेकविध गोष्टींचे चित्रण हा आंबेडकरी कवितेच्या आशयाचा मुख्य भाग आहे. केवळ कलेसाठी कला हा आंबेडकरी कवितेचा स्वभाव धर्म नाही, तर गुलामीची करणे दाखवत जातीव्यवस्थेवर प्रहार करीत, मानवी मूल्यांचा जागर करणे हा आंबेडकरी कवितेचा स्वभाव धर्म आहे. तो कवी नवनाथ रणखांबे यांनी जपला आहे. कवीच्या वेदना, विद्रोह त्यांच्या 'दाहकता' या काव्यातून बहुविध अर्थाने व्यक्त होते. तर 'मानवतेला डाग' या कवितेत जीवनाचे विदारक भाष्य आहे. तर 'मोडेल कणा' या कवितेत समकालीन वास्तवाचा खरा चेहरा कवीने प्रकट केला आहे. 'शेवट अजून बाकी आहे' ही कविता तर त्यांच्या समर्थ काव्याभिव्यक्तीचा एक लक्षणीय ठेवा म्हणावा लागेल.

आंबेडकरी कवितेत दीर्घ कवितेची परंपरा नामदेव ढसाळांनी रुजवली . नारायण सुर्वे यांचे ही नाव या यादीत समाविष्ठ करता




येईल. कवयित्रींमध्ये प्रज्ञा दया पवार, संध्या रंगारी, यांच्या पुढे नाव जात नाहीत. आता नवनाथ रणखांबे यांनी बानं शिकवलं , माय तुला मी पाहिलय, डॉ. आंबेडकर सारख्या दीर्घ कविता आणल्या आहेत. सभोवतालचे प्रश्न जटिल होतात. आणि त्या प्रश्नांना भिडणे गरजेचे होतं, तेव्हा दीर्घ कविता जन्म पावते. संघर्ष करून न्याय मिळवून देणे ही कवीची भूमिका आहे. यातून त्यांची कविता जन्माला आली आहे.

आज जगाची पुनर्रचना होताना,आंबेडकरी विचार जगभरातील वंचित मान्य करत आहेत. हे सत्य असले तरी जगभर उजवे सत्ताधारी होत आहेत, हे नाकारून चालणार नाही. त्यासाठी लिहिणारे आणि बोलणारे हवेत. तसे प्रत्यक्ष आघाडीवर लढणारेही हवेत. जनमानस हेरणारे नेते आणि कार्यकर्ते असल्याशिवाय नवा कार्यक्रम देता येणार नाही . आणि कार्यक्रमा शिवाय व्यवस्था बदलणे शक्य नाही. आज जसा दिसत नाही तसा झोकून देऊन काम करणारा कार्यकर्ता ही नाही . चळवळ संपलेली असल्याचे चित्र निर्माण झालेले आहे. हे पाहून कवी व्यथित होऊन. 'थरकाप' या कवितेत म्हणतो -

विसरलास तू

**अतित हमारा संघर्ष था ।**
**अतित हमारा संघर्ष है ।**
**अतित हमारा संघर्ष रहेगा ।**

# नवरा-बायकोचे भांडण अन् वाढणाऱ्या आत्महत्या



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

आधुनिक केसरी

**नवराबायको चे भांडण म्हणजे घटकेचा राग असतो. इकाही क्षण निघून गेले की मग कुणाची चुकी आहे हे समजते आणि मग सारे शांत होते. प्रत्येक घरी नवरा-बायकोचे काहींना काही कारणांमुळे भांडण होतं असते. कारण दोन भीन्न विचारांची माणसे एकत्र आली की, त्यांच्यात अगदी शुल्लक कारणावरून सुद्धा भांडणे होतात. पण काही वेळा ही भांडण टोकाला जातात आणि त्यातून काही वाईटही गोष्टी घडतात.**


एके ठिकाणी घडलेला प्रसंग आठवतो,नवरा लहान मुलाला हॉलमधे भात भरवत बसलेला आहे. आणि तेवढ्यात बायको तेथे येते आणि किरकोळ कारणावरून दोघांत बाचाबाची सुरू होते.शेवटी बायको रागाने बेडरूम मधे निघून जाते. हा आपला मुलाला भात भरवत असतो. त्याला वाटले नेहमीप्रमाणे बेडरूममध्ये रुसून झोपली असेल. त्यामुळे तो लक्ष देत नाही. भात भरवून झाला तरी पत्नीचा काहीच आवाज येत नाही, म्हणून तो बेडरूममध्ये जातो, पहातो तो काय? पत्नीने फॅनला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केलेली असते. ते दोन वर्षांच बाळ अनाथ करुन. ती निघून गेलेली असते. अगदी मन सुन्न करणारी ही घटना. यात दोष कोणाचा? आणि त्या लहान बाळाची चूक काय? का त्याने पोरकेपणाची सजा भोगावी. खूप विचार करायला लावणारी गोष्ट आहे ही. थोडासा संयम बायकांनीही दाखवायला हवाच ना? मरण इतकं स्वस्त झालय का हो? आणि ते स्वतः च अंगावर ओढून घ्यायच. किती बालीशपणाआहे हा.

अहो किमान आपल्याला जन्म देणाऱ्या आई-बापांचा तरी विचार करायला हवा. लहानाचं मोठं करून ते लग्नं करुन दुसऱ्याच्या घरी पाठवतात. किती यातना होत असतील त्यांना! आपली लाडकी लेक शुल्लक कारणावरून वाद घालून स्वतःच देवाघरी निघून गेली. किती धक्का मनाला बसत असेल? याचा विचार थोडा करायला हवा. राग हा माणसांना येतोच, पण तो राग कुठपर्यंत न्यायचा हे मात्र ज्याला त्याला समजलेच पाहिजे.

समाजात या घटनांची वाढ होताना दिसत आहे. पेपरला रोज कुठेतरी आत्महत्याची बातमी असतेच. पूर्वीही सर्रास आत्महत्या होत असायच्या. त्याची कारणेही वेगवेगळी असायची. स्त्रिया कमी शिकलेल्या, अडाणी, सासुबाईंचा जाच असायचा,नवरा हुंडा आणण्यासाठी बायकोचा छळ करायचा किंवा नवरा दोन लग्न करायचा, अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांचे आत्महत्यांचे प्रमाण वाढत राहायचे. पण हल्ली मुली शिकलेल्या, नोकरी करणाऱ्या हुषार आहेत. तरीसुद्धा आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. याची तशी बरीच कारणे आहेत. संशयी वृत्ती, बायको आपल्या पुढे जायला नको, घरातली कामे, लहान मुलांना सांभाळणे, आर्थीक बाबी तसेच विभक्त कुटुंब पद्धतीमुळे. सासुसासरे जवळ असले की भांडणे लागतात. कधी कधी मुलीच्या आईचा मुलीच्या संसारात वाढणारा हस्तक्षेपसुद्धा भांडणासाठी कारणीभुत होऊ शकतो.

अशी अजून खूप कारणे आहेत. की ज्यामुळे नवराबायकोची भांडणे लागून त्यांचे पर्यवसन आत्महत्या करण्यात होते. एक जीव जातो. पण अनेक समस्या निर्माण करून जातो. संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त तर होतेच. पण जी लहान मुले आहेत, की ज्यांना आईच्या प्रेमाची गरज आहे. त्यांचा आत्मा किती आईसाठी तडफडत असतो? त्या लहान मुलांची हाय लागणारच ना? बिचारे जन्माला आले हा त्यांचा दोष का? राग घटकेचा होतो, पण सजा ते लहान मुलं भोगत असते. सारखे माझी आई कुठाय? म्हणून विचारत असते. कल्पना करा आपल्या जाण्याने अख्खं घर उध्वस्त होते.

म्हणून मैत्रीणींनो लक्षात ठेवा, कितीही राग आला तरी आत्महत्याचा विचार कधीही डोक्यात आणू नका. जीवन फार सुंदर आहे हो, फक्त आपला दृष्टिकोन सुंदर हवा. राग आला तर मैत्रीणीकडे जा, माहेरी जा, नातेवाईकांकडे जा, एखाद्या बागेत जाऊन मस्त बसा आपोआप डोके थंड होईल. राग आला तर मनात आकडे मोजा, नाहीतर मोठ्याने गाणे म्हणा, एखादे आवडीचे पुस्तक वाचा. राग जसा लवकर येतो तसा तो लगेच जातोही. पण एकदा हातून गेलेली वेळ आणि आपलं अमुल्य जीवन परत येत नाही. म्हणून मैत्रीणींनो विचार करा आणि आत्महत्या टाळा.



# जगण्यातील समृद्ध अनुभूतीच्या हळव्या नोंदी
# ‘आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या’

आधुनिक केसरी

**‘आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या’ हा माधुरी चौधरी यांचा मराठी काव्यसंग्रह. जगण्यातील अनुभूतीच्या समृद्ध नोंदीच आहेत. कवी हा संवेदनशील, हळव्या मनाचा असतो. अवतीभवती घडणाऱ्या घटना त्याचे मन सूक्ष्मपणाने टिपत असते. दुसऱ्याचे दुःख कवीचे आपले दुःख होते. त्यातच स्त्री ही कोणत्याही जाती धर्मातील वा कोणत्याही काळातील असो, तिचा छळ, तिचे भोगणे सोस सारखाच आहे. ती शिकली, स्वावलंबी झाली, तरीही तिला तिच्या जबाबदाऱ्या आणि बाईपणातून मोकळे होता येत नाही. तिची मानसिक-शारीरिक तारेवरची कसरत सुरूच असते. तिचे बालपण आणि गगनचुंबी भरारी यातील हिंदोळे, यातच ती झुलत राहते. बरंच काही पेलत राहते. अशाच आशयाच्या माधुरी चौधरी यांच्या कविता स्त्री जीवनाची, तिच्या सांगण्याची, संघर्षाची ओळख करून देतात.**

## पुस्तक परीक्षण

**लतिका चौधरी**

‘आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या’ हा माधुरी चौधरी यांचा मराठी काव्यसंग्रह. जगण्यातील अनुभूतीच्या समृद्ध नोंदीच आहेत. कवी हा संवेदनशील, हळव्या मनाचा असतो. अवतीभवती घडणाऱ्या घटना त्याचे मन सूक्ष्मपणाने टिपत असते. दुसऱ्याचे दुःख कवीचे आपले दुःख होते. त्यातच स्त्री ही कोणत्याही जाती धर्मातील वा कोणत्याही काळातील असो, तिचा छळ, तिचे भोगणे सोस सारखाच आहे. ती शिकली, स्वावलंबी झाली, तरीही तिला तिच्या जबाबदाऱ्या आणि बाईपणातून मोकळे होता येत नाही. तिची मानसिक-शारीरिक तारेवरची कसरत सुरूच असते. तिचे बालपण आणि गगनचुंबी भरारी यातील हिंदोळे, यातच ती झुलत राहते. बरंच काही पेलत राहते. अशाच आशयाच्या माधुरी चौधरी यांच्या कविता स्त्री जीवनाची, तिच्या सांगण्याची, संघर्षाची ओळख करून देतात. नवरा जेव्हा नावाचा नवरा बनतो, तेव्हा ‘ती’ला घराची, स्वतःची पोटाची खळगी भरण्यासाठी हातपाय मारावेच लागतात. दोन घासासाठी दिवसभर राबून कमावलेल्या पैशावरही ‘तो’ झडप घालतो. आणि त्याची चैन, हौस-मौज, व्यसन, वासना पूर्ण करतो. ही हतबलता दर्शविणाऱ्या माधुरी चौधरी यांच्या काव्यओळी काळीज चिरून जातात. जसे -

‘फाटक्या पदरात पडलेले कष्टाचे दोन पैसे
त्यावर नवऱ्याचा डोळा पडण्याआधी...
आगंतुकपणे झडप घालत सर्पासारखी...
ओरबाडून नेतो तिची...... पान नं -16

‘त्याने’, समाजाने ‘ती’ला गृहीत धरलेले असते. आयुष्या, संसार बरोबरीने रेटत असतात. कधी कधी ‘तो’ मनाचा मोठेपणाही दाखवतो. कधीतरी दोन शब्द कौतुकाचे बोलत राहतो. भावनिक करत राहतो. ‘ती’ त्या शब्दावर, कौतुकावर भाळून तन-मन-धनाने ‘सारं’ समर्पित करीत राहते. तरी कुठेतरी, कसलीतरी उणीव, अभाव तिला सतावत राहतो. अस्वस्थ होत राहते. खेद, खंत, सल तिच्या मनाला पोखरत राहतात. सल याची की, तो लिहितो, बोलतो तिच्या सौंदर्यावर, हास्यावर, रुसली तर मनवतोही. पण नाही सोडवता येत त्याला दोघांच्या नात्यात पडलेल्या गुंत्यावर वा गाठीवर. ‘ती’चा उपभोग घेताना फुलवत राहतो तिला गोड शब्दांनी. पण नाहीच कळत त्याला आईपणाच्या वेदना. तिच्या भळभळत्या अदृष्य जखमा!

कवयित्री माधुरी चौधरी यांच्या कविता सामाजिकतेलाही अलगद स्पर्श करतात. घर, संसार, मुलं हे सारं निभावताना ‘आई’ नावाच्या बाईची आयुष्यभर होणारी दमछाक त्या नोंदवतात. मुलं मोठी झाल्यावर मात्र आई -बापाने खाल्लेल्या खस्ता, घेतलेले कष्ट सहज नजरेआड करतात. स्वार्थी होतात. आईबापास कोण सांभाळेल यावरून वाटणी होते. तरीही ‘आई’ ही आईच होते अखेरच्या श्वासापर्यंत. हे पाहताना हळव्या, संवेदनशील कवीमनाला यातना होतात. या वेदना, दुःख कवीच्या स्वतःच्या होत कागदावर उतरतात. कवितेच्या काही ओळी-

बाईपणाच्या वेदना...
अडवून धरतात पापणकाठ....
तरीही जपतेस हळूवार वात्सल्य तळहातावर...’

‘आई’ रूपातील ‘ती’, तिच्या वेदना, सोस नोंदवताना माधुरी चौधरी यांची संवेदनशीलता, निरीक्षणशक्तीचा आवाका ध्यानात येतो. कोणत्याही स्त्रीची वेदना ही प्रत्येक स्त्रीची वेदना असते. प्रत्येक स्त्री ही मातृत्वाची अनुभूती घेत असते. म्हणूनच कोणत्याही मातेला होणारा मानसिक, भावनिक छळ हा कवयित्रीचा छळ, त्रास, वेदना बनतो. त्यांच्या एका कवितेतील ओळी हा भाव सिद्ध करतात. जसे-

हळहळत निघून गेली तिची एकेक कागदपत्र... तिचं
डिग्री सर्टिफिकेट, प्रमाणपत्र... मॅरेज सर्टिफिकेट
गुंडाळून ठेवलेल्या तिच्या कितीतरी स्वप्नांना
जीवनाच्या प्रवाहामध्ये....’

आई रूपात ‘ती’ आपले आयुष्य, जगणं हृदयाच्या कप्प्यात साठवत राहते, आठवत राहते. आईपण निभावताना तिचं सौंदर्य, शरीर, मन, भावना, इच्छा, स्वप्न या साऱ्यांची आहुती देत राहते. त्यातही ती भरून पावते. जणू त्यातच तिच्या जन्माचं सार्थक !

अजूनही पोटावरील गरोदरपणाच्या खुणा..
. आठवण करून
देतात तिच्यातील आईच्या कर्तव्यपूर्तीची आणि
ती ओढून घेते चादर स्वप्नांवर. तिचे स्वप्न मात्र
सरणावर सोबत द्यायला....!

या ओळीतून तिच्या झिजण्याचे चित्रण दिसून येते.

नदी आणि बाई सारख्याच. नदी बाई होते. आणि बाई नदी. जन्मल्यापासून ते शेवटाला सामावून जाईपर्यंत दोघींचं जगणं सारखंच. आयुष्य, कर्तव्य एकच. मलिन ‘सारं’ काही धूत राहतात. खळखळ वाहत राहतात. आणि सागराला (‘त्याला’) जाऊन मिळण्यातच, ‘तो’ शी एकरूप होण्यातच जणू तिच्या जन्माचं सार्थक!

मळक्या कपड्यांबरोबर पिळून टाकते ती मनातील
मळभ.....’
पान नं-33

या काव्यओळी स्त्रीचं त्याग रूप स्पष्ट करतात. स्त्री एक सशक्त नारी आहे हे सिद्ध करण्यासाठी पुरावे देण्याची आवश्यकता नक्कीच नाही. आज पुरुषांनी गाजवलेले असे एकही क्षेत्र नाही ज्याला तिने स्पर्श केला नाही. जन्मताच तिच्यात चिकाटी, जिद्द, सहनशीलता, संयम, ठासून भरले आहेत. तरीही तिला केवळ ‘मादी’ म्हणून पाहणाऱ्या नजरा आजही शिल्लक आहेत. ती कोणत्याही वयाची असो, लहान पोर, कुमारिका, युवती, वयस्क, म्हातारी वा कोणत्याही जाती धर्मातील असो, तिच्याकडे विकृत नजरेने पाहण्याची गिधाडी वृत्ती आजही जिवंत आहे. न्याय, शिक्षा, पाप-पुण्य, नीती-अनीती, नाते, समाजभान याचा विचार न करता बेधुंद अशी माणुसकीला काळीमा फासणारी रानटी जमात आजही कीड्यासारखी वळवळत आहेच. स्त्री कितीही शिकलेली, सबळ असुदे, केवळ तिच्या स्त्रीदेहामुळे तिला बरंच काही भोगावे लागते. जेव्हा एखाद्या स्त्रीवर बलात्कार होतो तेव्हा तिला भोगाव्या लागणाऱ्या यातना, तिला होणाऱ्या वेदना असहनीय आहेत. जेव्हा ती न्याय मागायला जाते तेव्हाही ‘त्या’ नराधमाला अनेक काळ्या बाजूंनी सहारा दिलेला असतो. तिला न्याय मिळण्याऐवजी तिच्या अब्रूचे धिंडवडे मात्र निघतात. तिला जगणे नकोसे होते. हे भाव मांडणाऱ्या माधुरी चौधरी यांच्या काव्यपंक्ती काळजाला स्पर्श करतात-

तिच्या देहाशी खेळून फेकतात ते नराधम तिचं धड
भररस्त्यात मग सुरु होतो खऱ्या अर्थाने तिच्यावर
बलात्कार.... शारीरिक
मानसिक सामाजिक व न्यायालयीनही.....’ पान नं 41

आजही -’मुलगी हवी’, ‘बेटी बचाव’चे नारे देत असल्याचे आपण पाहतो. स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्री स्वातंत्र्यावर भाषणं आपण ऐकतो. त्या चळवळी,भाषणे निर्माण करून खरेच स्त्री स्वतंत्र, मुक्त होते? अर्थात स्वातंत्र्य याचा अर्थ स्वैर असा नव्हेच. स्वातंत्र म्हणजे स्त्रीवर होणारा अन्याय, जाच, छळ, बलात्कार या विळख्यातून तिची मुक्तता होणे. तिला तिचे मन, मत मांडता येणे, त्तिचे स्वप्न, महत्वकांक्षा तिला पूर्ण करता येणे असा अभिप्रेत आहे. यासाठी झगडताना तिची तारेवरची कसरत नक्की होते.

दोन पोरांना छातीशी कवटाळून उभी राहते खमकी
वाघीण सवयीप्रमाणे घरधन्याच्या पाठीशी बळ देत
उद्याच्या पोटापाण्याच्या चिंतेसह पान नंबर 47.

या ओळी तिचे साहस, कणखरपणा दर्शवितात. अशाही परिस्थितीत तिच्यात आशावाद झरत राहतो. ती उद्याची वाट पाहत आज आनंदाने रेटत राहते.

म्हणूनच बघते ती फाटलेल्या पत्रातून अंधारलेल्या
आभाळाकडे सूर्योदयाची वाट पाहत.... पान नं 47.

या ओळी तिच्यातील आशावाद दर्शवितात.

‘ती’चं रूप चितारताना माधुरी चौधरी बालपणीच्या स्मृतीत नकळत वाचकासही घेऊन जातात. लेखन किंवा रचना म्हणजे काय तर स्वानुभूतीची सुंदर रांगोळीच. कधी त्या रांगोळीत सुंदर क्षणांचे रंग भरले जातात. तर कधी खट्याळ वारा रांगोळीतले रंग उडून जातो. रांगोळी पुसून जातो. व ते विस्कळीत काळे करडे रंग पुन्हा सावरत बसावे लागतात.

मी बालपणीच्या आठवणी सोडल्या त्या त्या
आठवणीत रमावे
बस हीच आस जीवनास पान नंबर 4.

या ओळी वाचक, रसिका सही बालपणीच्या स्मृतीत डोकावण्यास भाग पाडतात. आणि कधीकधी रंग उडवून घेऊन जाणारा तो खट्याळ वारा ही ‘त्याच्या’ तुलनेत हवाहवासा किंवा बरा वाटतो. प्रियकरापेक्षा नक्की बरा वाटतो.

सभ्यतेचा मुखवटा घेऊन केसांशी खेळणाऱ्या
प्रियकरापेक्षा तर कधीही चांगला ना
वासनेने बरबटलेले हात केसात
फिरवून निघून जातो तो पुन्हा त्याच्या
सभ्य दुनियेत केसांना वाऱ्यावर सोडून...
पान नं- 49.

वरील ह्या ओळीत्या निराधार केसांना सावरणारा हा खट्याळ वारा कितीतरी चांगला असे स्पष्ट करतात.

जीवन जगत असताना माणसाचा बऱ्याच घटकांशी संबंध येतो. समाजात वावरताना कधी समाजमन जपावे लागते, तर कधी समाजवर्तन पाहून मन दुखावते. अशा अनेक अंगांना माधुरी चौधरी आपल्या रचनेतून स्पर्श करतात. मानवी भाव चित्रित करताना, सुखदुःख चितारताना त्या वाचकास त्या दुनियेत घेऊन जातात.

चांदण्यात कधी मी
मनसोक्त डुंबले ना
तो चंद्र पोर्णिमेचा
मला वर्ज्य आहे... पान नं- 53.

माणसाला सुख, शांती, प्रेम हवेच असते. त्यावरच तो जगत असतो. प्रेमाच्या, शांतीच्या, सुखाच्या शोधात तो जीवन व्यतीत करतो. सुख, शांती कुणालाच वर्ज्य नसते. पण....

चांदणचूरा तो सुखांचा
मी पदरात वेचताना
हा सूर्य जीवनाचा
आता अस्तास आहे पान नंबर 54.

पण त्याचा शोध घेता घेता अखेर माणूस अस्ताकडे प्रयास करतो. हे जीवनाचे अंतिम सत्य माधुरी चौधरी यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे.

कवी किंवा लेखक हा फक्त स्वतःवरच लिहत नाही तर संपर्कात, सहवासात आलेल्या, अनुभवलेल्या प्रत्येक घटकास त्याची लेखणी स्पर्श करत असते. त्याचप्रमाणे माधुरी चौधरी यांच्या ‘आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या’ या मराठी काव्यसंग्रहात त्यांनी जगण्यातील प्रत्येक घटकाचा स्पर्श केला आहे. त्याचे उदाहरण म्हणजे- ‘ओसाड गाव’, ‘नदीकाठी,’ ‘शहर’, ‘गावकुस’, ‘प्रतिबिंब’, ‘पाऊस’, ‘सूर्य’, ‘वास्तव’, ‘निसटलेले क्षण’, ‘अडचणींचे दिशादर्शक’, ‘कामगार’ इत्यादी कविता होय. एका कवितेत कवयित्री माधुरी चौधरी ह्या रेड लाईट एरियातील ‘ती’ तिची अवस्था, परिस्थिती, मानसिकता, यातना, वेदना, तिचे जगणे, जीवन मांडतात . वाचून काळीज कापले जाते. आपलं ‘सर्वस्व’ विकून ती घराला आई बापाला औषध घेण्यासाठी कमावते. स्वतः जळत असते. तरीही तिच्याकडे पाहणारे कुत्सित नजरा तिला रोज मारत राहतात. हे सत्य अनुभूती देणाऱ्या ओळी -

कधी तो मादक तिचा पडदा दुर सारुन बघा
तिच्या डोळ्यात दूर दूर दिसतील फक्त वेदना...!
पान नं-60.

माधुरी चौधरी यांच्या काव्यसंग्रहात चिंतनशीलता, वैचारिकता, समाजभान याचेही चित्रण आपल्याला दिसून येते. स्त्रीचे दुःख, वेदना मांडताना त्या सुखाचे क्षणही विसरलेल्या नाहीत. त्यांनी बापाचे जगणे, प्रेम, झिजणे तेवढ्याच ताकदीने रेखाटलेले आहेत.

आयुष्यातील चढ-उतारावर
कणखर ठेवला तुम्ही कणा
दुखावला तुम्ही परक्यांकडून...
आपल्यांकडूनही
पण तुम्ही मात्र हसतच राहिलात
पोहोचू दिल्या नाहीत त्या झळा
तुम्ही आमच्यापर्यंत... पान नंबर 61.

या ओळी कुटुंबाला आधार देणारा, दिन रात खपणारा,राबणारा बाप आपल्या डोळ्यासमोर उभा करतात.

बाप हा बाप असतो,
संसार रथाचे चाक असतो..

या माझ्या स्वतःच्या काव्य ओळींना सार्थ करण्यासारखे बापाबद्दलचे भाव माधुरीताई आपल्या कवितेत व्यक्त करतात. बापाच्या घामाच्या धारा म्हणजे गंगाजल. बापाच्या कष्टाला चंदनाचा सुगंध सांगत ‘बाप’ नावाचं नातं समृद्ध होतं. बाप अन बैल एकच. दोघांचे दुःख, कष्ट, एकच. हा भाव दाखविणाऱ्या ओळी म्हणजे-

दावणीची जनावरेही
ढकलत असतात उगाच
घशाखाली उसाचे वाढे
मालकाच्या पाठीवरचे
नकाराचे ओझे वाहून.. पान नं- . 65.

‘प्रतिबिंब’, ‘जीवन मंदिराच्या पायरीशी’, ‘ ‘ती अन मी’, अशा चिंतनशील कविता कवयित्रीच्या अस्वस्थ मनाची साक्ष देतात. ती अस्वस्थता कागदाच्या आभाळावर कवितेच्या रूपात रिती करतात.

त्या अस्वस्थ ओळींची शपथ
रात्रभर कविता माझ्या अंगणात
धिंगाणा घालत होती
अन मी या कुशीवरून त्या कुशीवर
रात्रभर कविता जगत होती...! पान नंबर 65.

या ओळी कवयित्रीच्या अस्वस्थ मनाची घालमेल दाखवतात.

आयुष्याच्या कॅनव्हासवर माराव्या
सुखदुःखाच्या रेघोट्या
म्हणून मी घेते पेन्सील हातात
उतरत जातात काळोखाच्या
कविता मनाच्या गाभाऱ्यातून
आसवांचे थेंब पडून.....! पान नंबर 57

वरील काव्यओळी कवयित्री माधुरी चौधरी यांची मानसिकता, वैचारिकता, संवेदनशीलता, अवलोकन ह्याची साक्ष आहेत. काव्याग्रह प्रकाशनाने प्रकाशित केलेला ह्या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ देखणे आहे. माधुरीताई यांच्या पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक : आयुष्याच्या कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या, कवयित्री : माधुरी चौधरी, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम**

# सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध कर्ज योजना

## किसान क्रेडिट कार्ड (पीक कर्ज) नूतनीकरण करून फायदे घ्यावे : शाखा व्यावस्थापक

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावळदबारा :** तालुक्यातील सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा असून या महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेला १८ ते २० गावांचा समावेश येतो. घाणेगांव तांडा, नांदातांडा, नादांगाव, डाभा, टिटवी, पळसखेडा, देव्हारी, पिंपळवाडी, मोलखेडा, चारुतांडा व सावळदबारासह समावेश येतो. शेतकऱ्यांनी किसान क्रेडिट कार्ड (पिक कर्ज) नुतनीकरण शेतकऱ्यांनी करून घ्यावे, असे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सावळदबारा व्यवस्थापक मयूर सोनटक्के यांनी केले आहे.




किसान क्रेडीट कार्ड (पिक कर्ज) नुतनीकरणाचे फायदे :
किसान क्रेडीट कार्ड (पिककर्ज) रू. ३ लक्ष पर्यंत रक्कमेचे नियमीत वेळेवर फेड केल्यास केंद्र सरकारद्वारे ३% व्याज व राज्य सरकारद्वारे १% व्याज परतावा मिळतो. ३० जुनच्या आधी कर्ज भरून नुतनीकरण केल्यास राज्य शासनाची डॉ. पंजाबराव देशमुख कृषी व्याज सवलत योजने अंतर्गत अतिरिक्त ३% व्याज परतावा मिळतो. व्याज सवलत लक्षात घेता रु.३ लक्ष पर्यंत बिनव्याज कर्ज सुविधेचा लाभ कर्ज नुतनीकरण करून आपण घेऊ शकता. राज्य शासनाच्या अर्थसंकल्प २०२२ च्या घोषणेप्रमाणे कृषी कर्ज नियमित परत फेड करणाऱ्यास रु.५०,०००/- चे प्रोत्साहन अनुदान शासनातर्फे घोषित केल्या प्रमाणे मिळेल. किसान क्रेडीटकार्ड नुतनीकरण केल्यामुळे आपले सिबिल स्कोर वाढ होण्यासाठी होते व पुढील पतपुरवठा मिळण्यास सहाय्यता होते.

थकबाकीचा कलंक नाहीसा होवून आवश्यकतेनुसार स्वतः सर्व कुटूंबातील सदस्यास पात्रतेप्रमाणे इतर कर्ज मिळू शकते. थकीत कर्जदाराचे कुटूंबातील सदस्यांना कर्जाचा लाभ घेता येत नाही. थकीत कर्जदाराच्या विरोधात भारतीय रिझर्व बँकेचे धोरण / सरकारी कायदे / बँकेचे ध्येय धोरणानुसार कर्ज वसुलीची कठोर कार्यवाही होवू शकते. तरी आपणास विनंती की, किसान क्रेडीट कार्ड (पिककर्ज) नुतनीकरणाचे फायदे लक्षात घेता लवकरात लवकर आपले खाते नुतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन शाखा व्यवस्थापक यांनी केले आहे.

रू. ३ लाखापर्यंत बिनव्याजी कर्जाच्या तसेच शक्लषराचे घोषणेनुसार रू.५००००/- रु प्रोत्साहनचा लाभ घेण्यास पात्र व्हावे, असे आवाहन व्यवस्थापाक मयूर सोनटक्के यांनी परिसरातील शेतकऱ्यांना केले आहे. या संधीचा शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा आणि थेट महाराष्ट्र ग्रामीण शाखा सावळदबारा यांच्याशी संपर्क साधावा अशी माहिती साप्ताहिक आपले ज्ञानपंख या वृतपत्राचे प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले. याप्रसंगी व्यवस्थापक मयूर सोनटक्के, काशीनाथ वावरे, शरद बोढारे, शिपाई राम भडजी उपस्थित होते.

# रेतीचे ट्रॅक्टर पकडल्याने तलाठ्याला मारण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील हिंगोणी येथे गौण खनिजाची चोरटी वाहतुक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसाठी तहसिल कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी ट्रॅक्टर अडविण्याचा प्रयत्न केले. त्यावेळी तलाठ्यांवर फावडीचा दांडा उगारत धमकी देत ट्रॅक्टर पळवून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून २ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी प्रशांत प्रल्हाद ढोले यांनी दि.१५ मे दुपारी ३ वा. दिलेल्या फिर्यादीनुसार, शिरपूर तालुक्यातील हिंगोणी येथून गौणखनिज विना नंबरच्या ट्रॅक्टरने अमन याकूब गिरासे घेवून जात असतांना तहसिल कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी दि.१५ मे रोजी सकाळी ११.३० वाजता पकडले. पकडलेल्या ट्रॅक्टरवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी तहसिल कार्यालयाकडे नेत असताना ट्रॅक्टरचे मालक अमन गिरासे व समाधान राजेंद्र कोळी यांनी मोटार सायकलवर येवून अधिकाऱ्यांना ट्रॅक्टरवरून खाली खेचत दमदाटी केली. तसेच छोटू भिल यास ट्रॅक्टर ताबडतोब घेवून जाण्यास सांगितले.

यावेळी समाधान कोळी यांने ट्रॅक्टरवर बसलेले तलाठी बाळु सानप यांच्यावर फावडीचा दांडा उगारून दमदाटी करत सानप यांनाही ट्रॅक्टर खाली उतरवत मोटार सायकल घेवून पळून गेले याची माहिती पोलिसांना दिली असता शिरपुर शहर पोलीसांनी २ लाख रूपये किंमतीचे विना नंबरचे ट्रॅक्टर, ७५ हजार रूपयांची ट्रॉली तसेच गौण खनिज असा एकूण २ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. गौण खनिजाची अवैध वाहतुक करणारे ट्रॅक्टर, ट्रॉलीसह पळवून नेणे तसेच शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात अमन गिरासे, समाधान कोळी व छोटू भिल यांच्या विरूध्द भ कलम ३५३ व विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# नव्या तंत्रज्ञानाचा वापर करा; प्रशासन अधिक गतीशील संवेदनशील करा : डॉ नितीन राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसंवाद कार्यक्रमात आज जनतेने मांडलेल्या तक्रारी, गाऱ्हाणे याची गंभीर दखल घेत पुढील पंधरा दिवसात सर्व समस्यांचा निपटारा झालाच पाहिजे, असे निर्देश राज्याचे ऊर्जा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.नितीन राऊत यांनी आज येथे दिले.

नागपूर जिल्हा प्रशासनाने आज पालकमंत्री डॉ.नितीन राऊत यांच्या निर्देशाप्रमाणे पहिल्या लोकसंवाद कार्यक्रमाचे लक्षवेधी आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात केले होते. निवडणुकीप्रमाणे अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने प्रत्येक नागरिकाला आपल्या शंकांचे समाधान करण्याची संधी यावेळी देण्यात आली. प्रशासन हे अधिक गतिशील, संवेदनशील असणे आवश्यक आहे. जनतेच्या प्रश्नांना सर्वप्रथम शांततेने ऐकून घेणे, सर्वात महत्त्वाचे आहे. मधली दोन वर्ष कोरोनामध्ये गेली. त्यामुळे शासन-प्रशासन, सामान्य जनता यातील संवाद जवळपास बंद होता. आरोग्य यंत्रणेकडे शासनाचे लक्ष होते. मात्र आता कोरोना सावटातून बाहेर निघाल्यानंतर सामान्यांच्या वेदना, संवेदना ऐकणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सूचित केले.

आजच्या लोकसंवाद कार्यक्रमाला आमदार अभिजित वंजारी, आमदार राजू पारवे, जिल्हाधिकारी आर. विमला, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्णन बी. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस उपायुक्त चिन्मय पंडित, याशिवाय सर्वच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गेल्या दहा वर्षांपासून काही प्रश्न सुटले नसल्याचे काही नागरिकांनी त्यांच्या लक्षात आणून दिले. अशा जटिल व कठीण प्रश्नांना त्यांनी स्वतःकडे घेतले. यासंदर्भात पालकमंत्री कार्यालयाला पत्र द्यावे, या समस्यांचा निपटारा स्वतः लक्ष घालून करेल. तर काही महत्वपूर्ण प्रश्न मंत्रालयात बसून सोडवू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी तक्रारकर्त्यांना दिले. आजच्या लोकसंवाद कार्यक्रमात प्रामुख्याने जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नगर रचना, भूमिअभिलेख कार्यालय, संजय गांधी निराधार योजना व तत्सम लाभार्थी योजना, जमिनीचे फेरफार, वनविभागाच्या जमिनी संदर्भातील समस्या, भूसंपादन, अतिक्रमण, याबद्दलच्या तक्रारी अधिक होत्या. एकूण 193 प्रकरणावर चर्चा झाली.

जिल्हाभरातील शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, तसेच शहरातील सार्वजनिक सोसायटी, पट्टेधारक यांचा सहभाग अधिक होता. अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या समस्या सांगताना शब्द फुटत नव्हते. अशावेळी त्यांच्यालेखी तक्रारीवरून न्याय देण्याची भूमिका पालकमंत्र्यांनी घेतली. काही समस्या त्यांनी जागेवरच निकाली काढल्या. जवळपास दोनशे तक्रारींपैकी शंभर तक्रारीवर त्यांनी पुढील आठवड्यात कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. जिल्हाधिकारी आर. विमला यांना कालमर्यादेत पूर्ण करायच्या समस्यांबाबत सर्वाधिकार देण्यात आले आहे. पुढील आठवड्यात ज्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले गेले त्याची नोंद आज घेण्यात आली आहे. लोकसंवाद कार्यक्रमात चर्चेत आलेला कोणताही प्रश्न प्रलंबित राहता कामा नये, अशी ताकिद त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आज दिली.

तत्पूर्वी उन्हाळ्याच्या दिवसात प्रशासनाने केलेल्या नियोजन पूर्ण कार्यक्रमासाठी त्यांनी 'जिल्हाधिकारी आर. विमला व त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांचे कौतुक केले. जवळपास 35 विभागाचे विभाग प्रमुख आज या ठिकाणी सार्वजनिक सुटीच्या दिवशी सामान्य नागरिकांसाठी तैनात होते. प्रशासनाने उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये नागरिकांना बसण्यासाठी बाहेर दोन सुसज्ज मंडप उभारले होते. नागरीकांसाठी चहा बिस्कीटची व्यवस्था करण्यात आली होती. पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था, प्रत्येक ठिकाणी कुलर लावण्यात आले होती.

दहा स्टॉलवर सामान्य नागरिकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी व्यवस्था सेतू केंद्रामध्ये करण्यात आली होती. टोकन मिळालेल्या नागरिकांना आतमध्ये प्रवेश दिला जात होता. त्यानंतर त्यांना सन्मानपूर्वक बसवून प्रशासन त्यांचे म्हणणे एकूण घेत होते. पालकमंत्र्यांनी व जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी नागरिक व संबंधित अधिकारी यांच्यामध्ये समन्वयकाची भूमिका घेतली. प्रत्येक प्रकरणात त्यांनी स्वतः निर्देश दिले. उन्हाळ्याच्या दिवसात आरोग्यविषयक कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी आरोग्य यंत्रणेने प्राथमिक उपचाराची व्यवस्थाही या ठिकाणी केली होती. जवळपास पाच तास पालकमंत्र्यांनी नागरिकांचे म्हणणे स्वतः ऐकून घेतले.




# सावळदबारा ग्रामपंचायतीच्या गेटसमोरच अस्वच्छता

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** तालुक्यातील येथील ग्रामपंचायतच्या गेट समोरच मुख्यदर्शनी भाग असलेला गेट या गेट मधूनच तीर्थक्षेत्र असलेल्या भगवान श्री चक्रधर स्वामींचे भव्य मंदिर आहे. या मंदिरात राज्य परराज्यातून हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येतात व शेजारीच ग्रामस्थ सुरेश बन्शी बावणे, श्रीराम बावणे, विजय बाविस्कर, प्रदिप ठाकूर, बेबाबाई देशमुख यांना नाहकच या दुर्गंधी व घाण कचऱ्याचा नाहक मोठा त्रास भोगावा लागत आहे.

या गेट समोरच शौचालयास बसणे, मांस आणून टाकणे, वेगवेगळा प्रकारचा कचरा आणून टाकणे, असे प्रकार नित्याचेच झाले आहे. यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरवली जात आहे व सामाजिक वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या ग्रामपंचायतमध्ये सर्व महिला पदाधिकारी असल्याने मुद्यामहून त्रास देण्याच्या हेतूने व रोगराई पसरण्याचा दृष्टीने अज्ञात व्यक्ती सदर कृती करत असल्याचे महिला पदाधिकारी यांचे म्हणणे आहे. या ठिकाणी शिवाजी विद्यालय, जि.प.शाळेची इमारत असून त्या शाळेतील विद्यार्थ्यांना याच गेट मधूनच शाळेत जावे लागते. हा त्रास दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे. सावळदबारा येथे शाळेसाठी एकमेव रस्ता आहे आणि ही दुर्गंधी केल्यामुळे विद्यार्थ्यांना ह्या दुर्गंधीचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत आहे.

यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. या अज्ञात लोकांवर कडक कारवाईची मागणी रविंद्र सुरेश बावणे यांनी केली आहे. आणि लवकरात लवकर हा कचरा साफ करण्यात यावा असे निवेदन सुध्दा रवींद्र सुरेश बावणे व शेजारील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत सावळदबारा यांच्याकडे दिले आहे.

# समर्पित आयोगाचा २८ मे रोजी अमरावती दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती तसेच महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती) आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग स्थापन केला आहे.

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला आहे.

समर्पित आयोगाचे सदस्य शनिवारी शनिवारी दिनांक 28 मे रोजी सकाळी 9.30 ते सकाळी 11.30 वाजता पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे नागरिकांची मते जाणून घेणार आहे.

या समर्पित आयोगाच्या अमरावती येथील भेटीत यवतमाळ जिल्ह्यातील ज्या नागरिक तसेच संस्था, संघटना यांना आरक्षणावर आपली मते मांडायची आहेत त्यांनी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी २७ मे पर्यंत करावी. तसेच यासाठी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क करावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी कळविले आहे.

# बारा किलोमीटरच्या रस्त्यावर बारा हजार खड्डे..!

## कन्नड-चिखलठाण रस्त्यावर मरणयातना; रस्ता रोको, आंदोलन करूनही परिस्थिती "जैसे थी वैसी है"

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**कन्नड :** तालुक्यात महामार्गाचे काम जलदगतीने करून रस्ते चका-चक करण्यात आले, तसेच मोठ्या प्रमाणात बायपास हाइवेचे काम आता अंतिम टप्यात राहिल्याचे दिसत आहे. ज्याप्रमाणे महामार्गाचे काम सुरू त्या-त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टोल नाके सुद्धा बनविण्यात आले आहे आणि तिथून सक्तीने टोल वसूली सुरु असल्याने माहिती समोर आली आहे. एकीकड़े शासन न होणारे काम तड़का फडकीने करीत आहे, ते पण कोट्यावधीचे काम, मात्र ग्रामीण भागाला जोडणाऱ्या रस्त्यालाच का घर-घर लागली आहे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहे. कन्नड-चिखलठाण रस्त्याची अत्यंत चाळणी झाली असून येणाऱ्या जाणाऱ्यांना तारेवरची करसत करावी लागत आहे. कन्नड चिखलठाण या रस्त्याची पूर्णपणे वाट लागली आहे. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांचे वाहने कृती होत असून वाहनधारकांना पाठ, मनक्याच्या आजारांसमोरे जावे लागत आहे. या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागात जाणीवपूर्वक वृक्ष दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

चिखलठाण ते कन्नड या रस्त्याची दुरवस्थामुळे पंचक्रोशीतील गावांचा विकास खुंटला असल्याची स्थिती सत्य समोर येत आहे. संबंधित विभागाचे अधिकारी ठेकेदारांच्या मनमानीमुळे ग्रामस्थांना मरण यातना भोगायला लागत आहे. रस्त्याच्या खड्ड्यांमुळे चिखलठाण, भोकनगाव, दाभाडी बहीरगाव, कुंजखेड़ा, हिवरखेडा, ठाकुरवाडी, नींडोंगरी, वडाळी घूसरतांडा, तिसगाव या गावातील नागरिकांना अत्यंत अडचणीचा सामना करावा लागत आहे. संतप्त नागरिकांनी चार वेळा नाक्यावर रास्ता रोको केला तरीदेखील प्रशासन याची काहीच दखल घेतलेली नाही. वेळेपुरते



आंदोलकांना दिलासा देऊन देऊन वेळ काढला जात आहे, मात्र या रस्त्याचा प्रश्न कोणी सोडायला तयार नाही.

कन्नड तालुक्यातील चिखलठाण या रस्त्याला तब्बल दहा वर्षे झाले आहे. त्याच्यामध्ये ज्या वेळेस मोर्चे आंदोलन केले जाते. त्याचवेळी संबंधित विभाग, थातुरमातुर डागडुजी करून वेळ काढून घेतात, मात्र या रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करून समस्या मिटवयाला कोणी तयार नाही. उदासीन लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. या सर्व प्रकारातील रस्त्याची तुलना करता गुणवत्तेच्या संदर्भात या रस्त्याचा स्पर्धा करू शकेल असा एकही रस्ता तालुक्यात अजिबात दिसणार नाही, हे ही नेमकी कोणाची अपयश? येथे कार्यरत

> **तालुक्यातील चिखलठाण हे गाव उद्योग धंद्यासोबत आधुनिक शेती करून प्रगतिशील शेतकरीचे**
>
> 
>
> **प्रमाण अधिकच आहे. येथे दुधाचा व्यवसाय प्रगतीपथावर सुरु आहे तसेच या ठिकाणी शेतकऱ्यांचे माल घेण्यासाठी दूर दुरुन व्यापारी वर्ग येतात. मात्र मागील काही वर्षापासून कन्नड चिखलठाण रस्त्याची अवस्था अधिक बिकट होत चालल्याने रस्त्याअभावी व्यापारी वर्ग येणे टालू राहिले, अनेकांना या रस्त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित विभागाने आमचा धिर चा फायदा उचलू नये व तातडीने या रस्त्याचे काम सुरु करावे.**
>
> **युवराज चव्हाण, माजी सरपंच चिखलठाण**

> **रस्त्यांमुळे अनेकांना मनक्याचे, कंबरेचे, पोटाचे आजार जडले आहे. या रस्त्याचा सर्वात जास्त**
>
> 
>
> **त्रास वयोवृद्ध लोकांना होतो. कन्नड जाण्याची रस्त्याची अवस्था बघून इच्छाच होत नाही. परिसरात मोठे दवाखाने नसल्याने गरोदर मातेची तर जास्तच हाल होत आहे. अनेकांनी तर खराब रस्त्यामुळे कन्नड येथील दवाखान्यात नेत असताना रस्त्यातच दम सोडले आहे. रस्त्याअभावी नागरिकांना नाहक त्रासाचा सामना करावा लागत लवकरात लवकर या रस्त्याचे काम सुरु करावे नसता उपोषण करण्यात येईल.**
>
> **शिवप्रभु ज्ञाने, सामाजिक कार्यकर्ते चिखलठाण**

असलेले विविध प्रशासकीय अधिकारी येथील लोकप्रतिनिधींना जुमानत नाही का? येथील रस्ते अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे कुरणे बनले आहे. भूतकाळात हे वारंवार सिद्ध झाले आहे. रस्ते बांधकामाचे निकषांचे पालन केले जात नाही, याकडे कोणाचे लक्ष नाही बहुतांशी रस्त्याची बाजू पट्टी नाही, साइड पंखे व्यवस्थित भरले नाही. ज्या ठिकाणी नवीन काम केले आहे तिथे रस्ता फुटायला सुरवात झाली आहे. वारंवार मागणी करून ही रस्त्याचे काम मार्गी लागत नसल्याने सम्बंधित विभागाबद्दल नागरिक रोषाची भावना व्यक्त करीत आहे.

**लोकप्रतिनिधी निवडणुका पुरते येता आणि मोठे आश्वासन देऊन गायब होतात**

चिकलठाण परिसरातील लोकांना कन्नड तालुका हा एक महत्त्वाचा भाग मानला जातो, कारण तिथे तहसील कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, पोलीस स्टेशन, बँका तसेच मुलांचे शाळेचे शिक्षण, उच्चशिक्षण, यासाठी ग्रामीण लोकांना कन्नड जावेच लागते. मात्र दररोज येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था पाहिल्याने दररोज येणारे जाणारे प्रवासांचे काय हाल होत असेल? हे आम्हालाच माहित असा प्रश्न ग्रामीण उपस्थित करत आहे. कन्नड शहरासोबत प्रत्येक ठिकाणी मोठमोठे महामार्ग निघालेल्या आहे. मात्र ग्रामीण रस्त्याकडे कोणीच लक्ष द्यायला तयार, चिखलठाण गावाची लोकसंख्या मोठी असल्याने इथे सर्वच प्रकाराचे नेते मंडळी, लोकप्रतिनिधी येतात. सभा घेतात. मोठ मोठाले आश्वासन देऊन गायब होतात, या रस्त्याबाबत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्याकड़े रस्त्याबाबत निवेदन देऊन कैफियत मांडली होती. मागील काही वर्षापासून रस्त्याची दयनीय दुरवस्था झाली असून याकडे कोणीच लक्ष द्यायला तयार नसल्यामुळे नागरिक संबंधित विभागाच्या विरोधात रोष व्यक्त करत आहे.

# संदीप मानकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सामाजिक कार्यकर्ते, शिवसैनिक तथा पत्रकार संदीप मानकर यांचा 16 मे रोजी वाढदिवस असतो. याचे औचित्य साधून 17 मे मंगळवार रोजी अनाड गावी त्यांनी मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले आहे.

या सामाजिक कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे महसुल तथा ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांचे शुभहस्ते होणार आहे. तर या शिबिरासाठी चिकलठाणा औरंगाबाद येथील लॉयन्स नेत्र रुग्णालयातील नेत्रतज्ञ डॉ. एस.गायकवाड व



जनसंपर्क अधिकारी डॉ.प्रभाकर काळे यांची उपस्थिती राहणार आहे. यासोबतच चिंचपूर ता.सिल्लोड येथील जनाधार संस्थेअंतर्गत असणाऱ्या वेणूताई वृद्धाश्रमातील वयोवृद्धांना देखील फळवाटप केले जाणार आहे.

तरी या मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा सर्व गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर यांनी केले आहे.



परतूर तालुक्यातील आष्टी येथे आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करुन आज सकाळी ठीक १०:३० मिनिटांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित साप्ताहिक स्वराज्य वर्ता संपादक स्वराज्य युवा संघटना संस्थापक राहुल आवटी, संदीप आवटे, संदीप घेणे, बाबासाहेब बागल, ओम राऊत, उद्धव डोळस, उमेश सोळंके, अभिजीत चौरे, अरुण डोईजडकर, रामेश्वर काळे, अशोक गाते, भागवत थोरात, विशाल थोरात, शंकर चव्हाण, गजानन आवटे, सुरेश थोरात, भागवत आगलावे, देवेंद्र रावते आदी उपस्थित होते.



# हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा इतिहास अदृश्य : बर्दापूरकर

## स्वातंत्र्यसेनानी माधवराव कुलकर्णी यांच्या मुक्तीपर्व या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**सुयोग मुळे**

**औरंगाबाद :** हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा इतिहास अदृश्य होत चालला आहे, अशी खंत मुक्तीपर्व या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यावेळी प्रविण बर्दापूरकर यांनी व्यक्त केली. हा प्रकाशन सोहळा देवगिरी महाविद्यालयात पार पडला.

मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सेनानी माधवराव कुलकर्णी यांचा कार्याविषयी बोलताना प्रविण बर्दापूरकर म्हणाले की, मराठवाडा या दैनिकात काम करत असताना मुक्तीसंग्रामाचा इतिहास मला माहीत होता. पण लढ्यात सामील असणारा एवढा मोठा माणूस माहित नव्हता. जुलमी राजवट घालवण्यासाठी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले लढे एवढे थरारक होते की आज जर माधवराव कुलकर्णी असते तर त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढावी लागली असती. माधवराव कुलकर्णी यांनी ते थरारक अनुभव त्यांच्या डायरीमध्ये शब्दबध्द केले आहेत. कुलकर्णींच्या हातात शस्त्र नव्हते. परंतु मुक्तीसंग्राम लढ्यात त्यांनी सशस्त्र क्रांती केली. हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढा देशात कुणालाही माहित नाही. तो या पुस्तकातून माहित होईल.

आपण गोऱ्यांच्या तावडीतून सुटून रझाकरांच्या तावडीत सापडलो आहोत. असा व्यवहारी, मुत्सद्दी, स्वातंत्र्यसेनानी मराठवाड्यात होऊन गेला, असे प्रतिपादन ज्येष्ठ माध्यमतज्ञ जयदेव डोळे यांनी मुक्तीपर्व या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात केले. हैद्राबाद एवढे बहुभाषिक संस्थान अन्य कोणतेही नव्हते. एवढ्या बहुभाषिक संस्थानात चळवळ उभा करण्याचे काम स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. आपद्धर्म म्हणून हिंसक चळवळ करावी लागली. जे लोक इतिहास विसरतात त्या लोकांचे भवितव्य नाही असे ज्येष्ठ विचारवंत राधाकृष्ण मुळी म्हणाले.

मराठवाडा मुक्तीसंग्रामचा इतिहास या पुस्तकातून वाचायला मिळतो. लहान मुलांना व पुढच्या पिढीला हा इतिहास कळवा म्हणून या पुस्तकाची छपाई करण्यात आली आहे. माधवराव कुलकर्णी यांचा इतिहास वाचल्यावर अंगावर शहारे येतात. हैद्राबाद लढ्यातील हे नायक मला माहीतच नव्हते. जेंव्हा हे सर्व लिखित स्वरूपात वाचायला मिळाले तेंव्हाच या गोष्टी लक्षात येतात. या पुस्तकाचे संदर्भमुल्य खूप मोठे आहे. माधवराव कुलकर्णी यांनी पंचकृषित वैद्यक व्यवसाय केला. संशोधक, विद्यार्थी, अभ्यासकांना ज्ञात करण्यासाठी कुलकर्णी कुटुंबीयांची ही जबाबदारी आहे की त्यांनी माधवरावांचा संपूर्ण इतिहास वाचकांसमोर आणला पाहिजे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार प्रवीण बर्दापूरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत उमरीकर यांनी केले.

# आकार मल्टीपर्पज फाउंडेशनच्यावतीने रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा आज

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आकार मल्टीपर्पस फाउंडेशन आणि हिंगणघाट येथील बी.आर.आंबेडकर शिक्षण संस्थे च्यावतीने 17 मे रोजी, हिंगणघाट येथे दिवंगत डॉ. आत्मारामजी मोहन जवादे आणि दिवंगत शांताबाई आत्माराम जवादे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.बी.आर. आंबेडकर शिक्षण संस्थेचे सचिव अनिल आत्माराम जवादे यांच्याकडून रुग्ण सेवेकरिता रुग्णवाहिका सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमात शिक्षण संस्थेचे उद्घाटक व अध्यक्ष सचिव अनिल जवादे यांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितीत हिंगणघाट येथील दिनेश कदम उपविभागीय पोलिस अधिकारी, तसेच शिल्पा कमलेश सोनाले उपविभागीय अधिकारी, आणि किशोर चाचरकर वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय, यांची प्रमुख उपस्थिती राहतील. आयोजक अनिता मसराम यांनी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# लुंबिनी बुद्ध विहार समितीतर्फे भगवान बुद्ध जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जगाला शांतीचा संदेश देणारे महातारूनिक भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त धुळे येथील लुंबिनी बुद्धा विहर समितीतर्फे भगवान बुद्ध यांची जयंती दरवर्षी प्रमाणे आनंदात साजरी करण्यात आली. लुंबिनी येथील बुद्ध विहार हे उत्तर महाराष्ट्रातील धुळ्यातील सर्वात सुंदर ऐतिहासिक वास्तू आहेत. या समितीचे सर्व सदस्य सुशिक्षित व जेष्ठ रिटायर नागरिक आहेत. हे बुद्ध विहार समितीचे सदस्यांनी स्वखर्चातून निर्माण केले असून काहीशी देणगी जमा करून काम चालू आहे. आज भगवान बुद्ध जयंतीनिमित्त समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. भैय्यासाहेब पवार, इंजिनीयर धर्मेंद्र झालटे, अशोक वाघोडे, अर्जुन गायकवाड, बी.बी.साळवे, प्रा. विजय पवार, राजेंद्र बोराडकर, प्रा.मोहन मोरे, विनय सूर्यवंशी, विनोद चव्हाण, सुभाष निकुंभ, दिलीप गुलाले, साहेबराव लोंढे व सर्व महिला



आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# ‘जिवंत असाल तर या...!’ पथनाट्याने केली जनजागृती

## नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी कलावंतांचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सोप्या भाषेत, हसत-खेळत जालन्याच्या पाणी समस्येवर नेमके बोट ठेवणारे ‘जिवंत असाल तर या...!’ हे पथनाट्य दि. 14 मे रोजी कुंडलिका नदीपात्रात सादर करण्यात आले.

जालना शहरातील कुंडलिका व सीना या नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी लक्कडकोट पुलाजवळ सध्या श्रमदान मोहीम सुरू आहे. या मोहिमेत नागरिकांचा सहभाग वाढावा म्हणून जालन्यातील नाट्यकलावंत पुढे सरसावले आहेत. शहरातील कवी आणि रंगकर्मी विनोद जैतमहाल यांनी हे पथनाट्य लिहिले असून यात लेखकासह सुमीत शर्मा, रेखा चव्हाण, ओंकार बिनीवाले, तेजस्विनी वाघमारे आणि राहुल काळे यांनी अभिनयाचे रंग भरले आहेत. पथनाट्याची निर्मिती उत्कर्ष थिएटरने केली आहे.

या नाट्यप्रयोगाला जिल्हाधिकारी विजय राठोड, समस्त महाजन ग्रुपच्या विश्वस्त नूतनदीदी देसाई, उद्योजक भाईश्री रमेशभाई पटेल, सुनीलभाई रायठठ्ठा, दै. आनंद नगरीचे संस्थापक संपादक शिवरतन मुंदडा, माजी प्राचार्य डॉ. रमेश अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील अनेक मान्यवर नागरिकांनी व एसआरपीच्या जवानांनी या मोहिमेत श्रमदान केले.

### पुढच्या पिढ्यांना काय सांगाल?

**जन्माला येऊन केवळ मरून जाण्यासाठी माणसाचा जन्म नाही. जिवंत आहोत तोवर समाजासाठी काही तरी भरीव कार्य आपण केले पाहिजे. या भावनेतून प्रत्येक जालनेकराने या नदी पुनरुज्जीवन मोहिमेत सहभागी व्हावे. तरच आपण पुढच्या पिढ्यांना अभिमानाने सांगू की, आम्ही जालन्याला जलसंकटातून मुक्त केले.**

**विनोद जैतमहाल**

जालना शहरात दहा, पंधरा दिवसांनी पाणी का येते? जायकवाडीहून येणाऱ्या पाण्याचे बिल किती येते आणि ते कोण भरते? असे अनेक प्रश्न या पथनाट्यात उपस्थित केले आहेत. जालन्यासारख्या सर्वार्थाने समृद्ध, श्रीमंत शहरात दोन नद्या आहेत आणि त्या शहरात दहा, पंधरा दिवसांनी पाणी येते ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे!



या नद्या जर स्वच्छ केल्या, खोल आणि रुंद केल्या तर पावसाचे वाहून जाणारे प्रचंड पाणी साठवता येईल. भूजल पातळी वाढेल. बोअरला पाणी येईल. पाण्याचा साठा करून सर्व जालनेकरांना नियमित पाणी देता येईल. हा मोठा विचार करून कुंडलिका-सीना रिजुवनेशन फाउंडेशन हे प्रचंड काम करत आहे. पण या मोहिमेत प्रत्येक जालनेकराचा सहभाग असलाच पाहिजे. बाकी खोलीकरण व रुंदीकरणाचे काम जेसीबी सारखी यंत्रे करणारच आहेत, पण जबाबदार जालनेकर म्हणून आपण नदीपात्रात उतरून जीवनदायी नद्यांची स्वच्छता केली पाहिजे हा विचार या पथनाट्यात सहजपणे मांडला आहे.

‘जिवंत असाल तर या...!’ हे पथनाट्य संपूर्ण शहरात ठिकठिकाणी आणि प्रत्येक कॉलनीत होणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे. श्रमदानाची पुढील मोहीम जागतिक पर्यावरण दिनी म्हणजेच 5 जून 2022 रोजी होणार असून यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बीएमएम अधिवेशन २०२२ मध्ये विश्व मराठी परिषदेच्या प्रतिनिधी मंडळाची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बीएमएम अधिवेशन २०२२ मध्ये विश्व मराठी परिषद आपले प्रतिनिधी मंडळ घेऊन जाणार आहे. बृहन महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका ही अमेरिकेतील ५९ मराठी मंडळांची एक शिखर संस्था आहे. दर दोन वर्षांनी अमेरिकेमधील मराठी बांधवांसाठी ती एक अधिवेशन आयोजित करते. यावर्षीचे बृहन महाराष्ट्र मंडळाचे (बीएमएम) २० वे अधिवेशन ११ ते १४ ऑगस्ट, २०२२ रोजी अमेरिकेतील न्यू जर्सी राज्यातील अटलांटिक सिटी येथे संपन्न होणार आहे. साधारतः ५००० हून अधिक अमेरिकेतील सुस्थापित मराठी बांधव (डॉक्टर, इंजिनीअर, आर्थिक सल्लागार, वकील, बुद्धीजीवी, कॉर्पोरेट अधिकारी, उद्योजक आदि) यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. हे कन्वेन्शन संपन्न होण्यासाठी अमेरिकेतील ५९ मराठी मंडळे आणि हजारो मराठी बांधव सक्रियपणे कार्यरत आहेत.

बीएमएम अधिवेशन २०२२ मध्ये विश्व मराठी परिषद आपले प्रतिनिधी मंडळ घेऊन जाणार आहे. विश्व मराठी परिषदेच्या या उपक्रमासाठी डॉ. सतीश देसाई मार्गदर्शन करीत आहेत.

बीएमएम अधिवेशन हा केवळ मेळावा नसून त्यामध्ये अमेरिकेतील आणि जगभरातील नामवंत मराठी शास्त्रज्ञ, उद्योजक, व्यावसायिक, शिक्षण तज्ज्ञ, विद्वान, समाजसेवक, साहित्यिक, कलाकार, अभिनेते, इ. विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष निमंत्रण असते. त्याचप्रमाणे गायन, नृत्य, कीर्तन, तसेच नाट्यप्रयोग इ. सादर केले जातात.

अधिवेशनामध्ये एक दिवस विशेष बिझनेस समिट आयोजित केले जाते. याबरोबर विविध नाविन्यपूर्ण उत्पादने, प्रॉडक्टस्, सेवा उद्योग, स्टार्ट अप्सचे स्टॉल्स उभारले जातात.

अधिवेशनामध्ये सलग चार दिवस अमेरिकेतील आर्थिकदृष्ट्या सक्षम मराठी बांधव भेट देत असतात. यामध्ये वैयक्तिक भेटीगाठी, कल्पनांची, प्रकल्पांची आणि विचारांची देवाणघेवाण होत असते. यातून अनेक संधी उपलब्ध होतात. नवीन कल्पनांना व्यासपीठ मिळते. मोठ्या प्रमाणात परिचय आणि परस्पर संबंध दृढ होण्यासही मदत होते. त्यातून पुढील संधी व प्रगतीची कवाडे खुली होतात. एक वैश्विक दृष्टिकोनही तयार व्हायला मदत होते.

जागतिक पातळीवर होणाऱ्या या संमेलनामध्ये अधिकाधिक मराठी बांधवांनी, तरुणांनी, उद्योजकांनी सहभागी व्हावे असे आवाहन विश्व मराठी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. क्षितिज पाटुकले यांनी केले आहे.

उपक्रमासंबंधी अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी HTTPS://WWW.VISHWAMARATHIPARISHAD.ORG/BMMCONVENTION2022 या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक महितीसाठी सौ. स्वाती यादव 9673998600, प्रा. अनिकेत पाटील 7507207645 यांच्याशी संपर्क साधावा.

# समाजभूषण पुस्तकास २ पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या “समाजभूषण” पुस्तकास राज्यस्तरीय तापी साहित्य पुरस्कार जाहीर झाला असून तो ५ जून रोजी गोव्यात होणाऱ्या अखिल भारतीय शिव साहित्य संमेलनात देण्यात येणार आहे. समाजभूषण पुस्तकास मिळालेला दुसरा पुरस्कार म्हणजे “शब्दप्रतिभा साहित्य रत्न पुरस्कार” होय. हा पुरस्कार नुकताच पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या शानदार कार्यक्रमात “समाजभूषण”च्या सहलेखिका रश्मी हेडे यांनी पुणे महानगपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने, आंतरराष्ट्रीय उद्योग सल्लागार सचिन ईटकर, कासार समाज मध्यवर्तीचे युवा अध्यक्ष प्रकाश दादा तवटे, जेष्ठ कवयत्री ज्योत्स्ना चांदगुडे, कार्यक्रमाच्या आयोजक स्मिता धारूरकर आदी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.

ज्या व्यक्ती शिकतील, नवे काही करण्याचे धाडस करतील, त्या नक्कीच यशस्वी होतील, असा यशाचा मूलमंत्र सांगणारे हे “समाजभूषण” पुस्तक मुंबई येथील प्रसिद्ध भरारी प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. उद्योग व मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन मंत्रालयात २७ सप्टेंबर २०२१ रोजी झाले. त्या नंतर अनेक मान्यवरांच्या हस्ते विभागीय प्रकाशन समारंभ झाले. या प्रेरणादायी पुस्तकाची १ हजार प्रतींची पहिली आवृत्ती संपत आली आहे. या पुस्तकात कासार समाजातील ३५ स्त्री पुरुषांच्या यशोगाथा आहेत. प्रत्येकाची यशाची वाटचाल जरी वेगळी असली तरी त्यांच्यातील कष्ट करण्याची तयारी, जिद्द, चिकाटी, प्रयत्नवादी व सकारात्मक विचारसरणी, अभ्यासू, धाडसी वृत्ती हे गुण समान आहेत. त्यांचा जीवन प्रवास, आलेले चढ उतार, यश अपयशाच्या गोष्टी व त्यावर हिंमतीने केलेली मात खूप काही शिकवून जाते. न थांबता, न डगमगता प्रत्येक परिस्थितीचा सामना केला तर यश निश्चितच प्राप्त होते हे या पुस्तकात अतिशय सुंदर व सोप्या शब्दात मांडले आहे. समाजभूषण पुस्तकापासून प्रेरणा घेऊन इतरही काही व्यक्ती, समाज अशा स्वरूपाची पुस्तके काढण्याच्या मार्गावर आहेत यातच समाजभूषणचे सार्थक आहे.

# कारागृहातील कैद्यांचा संशयास्पद मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** येथील मध्यवर्ती कारागृहातील कैदीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने मेडिकलमध्ये तणावाचे वातावरण झाले होते. नंदनवन येथील श्रीनगर येथील रहिवासी आकाश ताराचंद घोड (28) हा मागील काही दिवसांपासून एका हत्येचा आरोपाखाली नागपूर कारागृहात होता. परंतु काल अचानक त्याचा कारागृहात मृत्यू झाल्याने खळबळ उडाली होती. त्याचा मृत्य पोलिसांनी केलेल्या मारहाणीत झाला असा आरोप मृतकांच्या वडिलांनी केल्याने मेडिकलमध्ये पोस्टपार्टम करताना पोलीस बंदोबस्त ठेवावा लागला होता. पोस्टमार्टम करताना व्हिडिओग्राफी करण्यात आली. पोस्टमार्टमचा अहवाल आल्यानंतर तपासाची दिशा ठरविण्यात येणार आहे. मारहाणीत मृत्यू झाला असल्यास कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिल्याने कुटूंबाने मृतदेह स्वीकारला. आज त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कृषि महाविद्यालयात निविष्ठा धारकांकरिता DAESI अभ्यासक्रम पदविका प्रमाणपत्र वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कृषि विस्तार सेवा पदविका अभ्यासक्रम (जुन २०२० ते २०२१) DAESI पुर्ण केलेल्या कृषि निविष्ठा वितरकांना तुकडी-२ चे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कृषि महाविद्यालय, कांचनवाडी येथे पार पडला. ३९ निविष्ठा धारकांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि डॉ. दत्तात्रय शेळके (संचालक/ प्राचार्य, कृषि महाविद्यालय) हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने झाली, प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी हरिभाऊ ठोंबरे यांनी प्रशिक्षणाविषयी मनोगत व्यक्त करताना तज्ञ व्यक्तींकडून आम्हाला मार्गदर्शनमार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर इतरही सोयी सुविधा या वाखान्याजोग्या होत्या असे नमुद केले. डॉ. शेळके यांनी आपल्या भाषणात वितरकांनी प्रशिक्षण झाले



म्हणजे सर्व काही झाले असे नाही तर नविन झालेल्या तंत्रज्ञानाविषयी वारंवार उजळणी करणे गरजेचे आहे असे नमुद केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. श्रीकांत देशमुख यांनी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था शेतकऱ्यांची बांधिलकी समजून काम करीत आहे व यापुढेही असेचकार्य सुरु राहील असे नमुद केले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव पद्माकरराव मुळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी कृषि निविष्ठा वितरक व महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.अतुल भोंडवे यांनी केले. सुत्रसंचलन प्रा.प्रणिता मुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सुशिल सातपुते यांनी केले.

# दृष्टीबाधित मसाजोपचार प्रशिक्षणार्थींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणार : डॉ. प्रकाश देव

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आशादीप अपंग, महिला-बाल विकास संस्थेच्या दिव्यांग प्रेरणा केंद्राद्वारे विदर्भ संशोधन मंडळाच्या संयुक्त विद्यमाने मसोजोपचार प्रशिक्षण संपन्न झाले. समारोप कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. व्यासपीठावर विराजमान सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्ष डॉ. प्रतिमा शास्त्रींनी प्रशिक्षण शिबिराचा अहवाल सादर केला. प्रशिक्षक अजय कलसे यांच्या शिकविण्याच्या पद्धतीचे बारकावे सांगून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. तसेच सर्व प्रशिक्षणार्थींचे कौतुक व अभिनंदन केले. असे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिव्यांगांना मिळाल्याने समाधान व्यक्त केले. संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. निवेदिता कुळकर्णी, डॉ.पुष्पा दुर्गे आणि डॉ.नूतन देव यांनी शरीरशास्त्र आरोग्यविषयक मार्गदर्शन करून प्रशिक्षणार्थींचा उत्साह वाढवला. याप्रसंगी संस्थेचे हितचिंतक व सल्लागार आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. प्रकाश देव यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नागपूर केंद्राच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.



प्रशिक्षण समारोपात प्रशिक्षणार्थी तसेच संस्थेच्या पुढील वाटचालीकरता सातत्याने प्रयत्न करणार आणि दिव्यांगांना संधी उपलब्ध करून देणार असे डॉ. प्रकाश देव म्हणाले. तसेच विविध वैद्यकीय संघटनाद्वारे दिव्यांगांना उपचारासाठी साह्यय करण्याचे त्यांनी आश्वासन दिले “मेहनत करने वालों की कभी हार नही होती” असे म्हणत प्रशिक्षणार्थींना सतत आपल्या शिक्षणाचा उपयोग करत आत्मनिर्भर होण्यासाठी शुभेच्छा दिल्यात. प्रयत्न करणाऱ्यांच्या पाठीशी मानवरूपी देव आहे हा विश्वास त्यांनी दिला. संस्थेच्या पोषण प्रकल्पाला विविध योजनांमध्ये सहभागी करून घेण्यात येईल असे प्रतिपादन डॉ. देव यांनी केले. आयुर्वेदिक डॉक्टरांच्या ग्रुपवर सर्व प्रशिक्षणार्थी चे फोन नंबर व एरिया देऊन त्या त्या एरियातील काम त्या प्रशिक्षणार्थींना मिळू शकेल यासाठी विशेष प्रयत्न करेन असे डॉ.गौतम जोगड म्हणाले. आणि अंशतः दृष्टीबधित प्रशिक्षणार्थींना पंचकर्म प्रशिक्षण देण्याची योजना त्यांनी बोलून दाखवली.

पश्चिम नागपूर जैन समाजाचे सचिव पवनजी खाबिया यांनी तुम्ही अतिशय चांगलं काम करत आहात त्यामुळे जैन समाज तुम्हाला सर्वोतोपरी मदत करू शकेल असे प्रतिपादन केले. मी स्वतः CA असल्याने CSR फंडातूनही संस्थेला मदतीचा हात देण्यासाठी सहकार्य करेन. तुमच्या भविष्यातील योजनांसाठी सर्व प्रकारे अर्थसहाय करण्याचा मानस व्यक्त केला. अंधासाठीच्या सरकारी योजना, त्याचा लाभ कसा घ्यावा याविषयी तसेच लॉक डाऊन काळात त्यानी दिव्यांगांना कशी मदत केली याविषयी विस्तृत माहिती रेवारामजी टेंभुर्णीकर यांनी दिली. त्यांनतर सर्व प्रशिक्षणार्थींना मार्कशीट, प्रमाणपत्र, मसाज किट बॅगचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या किटचे प्रायोजकत्व पश्चिम नागपूर जैन समाजाने केले आहे. याप्रसंगी संस्थेच्या ई मॅगझीनचे विमोचन करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे जेष्ठ सल्लागार लालासाहेब पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत संस्थेच्या संस्थापिका स्व. उषाताई संत यांच्या स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी अध्यक्ष व सर्व चमू झटत असते त्यामुळे समाजातील सर्व थरांतून संस्थेला तुमच्या सारख्या सर्वांचे मदतीचे हात लाभत असतात. आणि त्यामुळे सर्वांचा उत्साह वाढतो असे सांगत त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे संचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ.वृंदा जोगळेकर यांनी करून दिला. सौ.सुप्रिया केकतपुरे यांनी प्रशिक्षणार्थींचा निकाल जाहीर केला. सचिव सौ.अपर्णा कुळकर्णी यांनी आभार मानले.

# ‘शामलाक्षरी’ साहित्य विश्वाला मिळालेली नवी देणगी : गिरीश प्रभुणे

आधुनिक केसरी न्यूज



**पिंपरी (पुणे) :** शिवतेजनगर, चिंचवड येथे शामलाक्षरी काव्यसमूह, कमलविश्व राज्य स्पर्धा समूह, लालित्य नक्षत्रवेल कथासमूह यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी गिरीश प्रभुणे म्हणाले, ‘शामला पंडित यांनी शामलाक्षरी काव्य रचनेचा नवीन प्रकार निर्माण केला आहे. तो अधिक लोकाभिमुख व्हावा, लोकप्रिय व्हावा. नवीन कलाकृती रुजण्यासाठी खूप वेळ लागतो,परंतु शामलाक्षरी हा काव्य प्रकार अतिशय कमी वेळामध्ये लोकप्रिय होत आहे, ही चांगली बाब आहे. संत ज्ञानेश्वरांनी ओवी निर्माण केली. महात्मा फुले यांनी अखंड रचना निर्माण केली त्याचप्रमाणे शामलाक्षरी छंदबद्ध नव काव्यनिर्मिती ही साहित्य विश्वाला मिळालेली नवी देणगी आहे.’ चिंचवड येथे झालेल्या या कार्यक्रमात गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते “उन्मेष” हा शामलाक्षरी प्रातिनिधिक काव्य संग्रह, शब्दगंध प्रातिनिधिक कथासंग्रह, शब्दांगण शामलाक्षरी चारोळी संग्रह आणि ई-बुक शामलाक्षरी चारोळीसंग्रह प्रकाशित करण्यात आला. यावेळी ग्रामीण कथाकार बबन पोतदार, नगरसेवक नारायण बहिरवाडे, प्रसाद दीक्षित, कल्याण पानगे, प्रणाली प्रकाशनाच्या कु .प्रणाली पंडित उपस्थित होते . ई बुक चारोळी संग्रहाच्या शुभांगी तपस्वी, “शब्दांगण” - सुनिता वैद्य - ग्राफिक्स अंगद दराडे” यांनी व “शब्दसरी” शुभांगी तपस्वी -ग्राफिक्स प्रमोद सूर्यवंशी यांनी उत्कृष्ट ई बुक निर्मिती केली. नारायण बहिरवाडे यांनी ‘नवनिर्मिती दैवी देणगी आहे, असे गौरवोद्गार काढले.’ “शामलाक्षरी नव काव्यप्रकार मराठी भाषेच्या विकास व वृध्दीसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी नवसंजीवनी ठरणार आहे. एक शब्द भिन्न अर्थ असलेली काव्यरचना मनास भावते. अनेक शब्दाची माहिती होते. मराठी भाषेबद्दल आवड, वाचन संस्कृती दृढ होण्यास प्रेरणादायी आहे, असे मत सुनिता वैद्य यांनी व्यक्त केले.” अशोक पानगे, दिलासा संस्थेचे सुरेश कंक,नंदकुमार मुरुडे, राज अहेरराव, ॲड. अंतरा देशपांडे, ह. भ. प. अशोक गोरे महाराज, मा. शोभाताई जोशी, रजनी अहेरराव, वर्षा बालगोपाल, दीक्षित बंधू भगिनी, साहित्य, शैक्षणिक, कला क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संपादिका शामलाताई पंडित- दीक्षित यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. सुप्रिया लिमये यांनी शामलाक्षरीचे गायन केले. तानाजी एकोंडे, श्रीकांत दीक्षित यांनी पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले. कवयित्री डॉ. शितल मालुसरे यांनी सुंदर प्रस्तावना दिली आहे. कवयित्री नंदा कोकाटे (मुंबई) कवयित्री वैशाली पडवळ, कवयित्री शुभांगी तपस्वी, कवयित्री मार्या देठे, कवयित्री सीमा कुलकर्णी, कवयित्री प्रियंका मोरे (मुंबई), कवयित्री निलिमा जोशी, मा. शारदा पानगे यांनी पुस्तकास शुभेच्छा दिल्या आहेत. स्वामी समर्थ विरंगुळा केंद्र चे अध्यक्ष प्रा. हरिनारायण शेळके यांनी साहित्य निर्मितीस सतत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सौ . शामला पंडित (दीक्षित) प्रणाली प्रकाशन चिंचवड ,यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले . सविता वेदपाठक यांनी सूत्रसंचलन केले . निलेश महागावकर यांनी आभार मानले.

# योग साधना भारतीय संस्कृतीचे प्रतीक : डॉ. भिसे

## योग डे निमित्त योगाभ्यास सुरू : क्षेत्रीय लोक संपर्क ब्युरोचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**वर्धा :** पाश्चात्य संस्कृतीचे दृष्परीणाम लक्षात आल्यामुळे अनेक लोक योग साधने कडून वळून आपली प्रकृती सुदृढ बनवित आहेत. जागतिक योगा डे ला भारतीय संस्कृतीचे प्रतिक म्हणून संपूर्ण विश्वाने स्विकारले आहे, असे प्रतिपादन सामान्य रूग्णालयाच्या प्रभारी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. संगीता भिसे यांनी आज येथे केले.

जागतिक योगा डे निमित्त माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या क्षेत्रिय लोक संपर्क ब्युरो, वर्धा आणि परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय यांच्या मार्फत झांशी राणी चौकातील परिचारिका प्रशिक्षण विद्यालयात योगाभ्यास कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. त्यावेळी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आर. जे. पराडकर, योगा प्रशिक्षक विजेंद्र दिक्षीत, माहिती व प्रसारण मंत्रालयाचे वर्धा येथील क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत, वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पना सुनतकरी उपस्थित होते.

दरवर्षी 21 जून रोजी योगा डे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून वर्धा येथे योगाभ्यासाला सुरूवात करण्यात आली आहे.


डॉ. भिसे म्हणाल्या की, भारत सरकारने योगा डे हा अत्यंत छान उपक्रम सुरू केला आहे. दररोज योगा केल्यामुळे अनेक आजारांना आळा घालणे शक्य आहे. त्यामुळे नागरीकांना योगा करण्याकडे भर द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

डॉ. पराडकर म्हणाले, दररोज योगा करणे ही सवय प्रत्येक नागरीकांनी लावणे आवश्यक आहे. योगा आणि प्राणायामचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न केले जात आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी योग प्रशिक्षक विजेंदर दिक्षीत यांनी योगा व ध्यान साधनेचे विविध प्रात्याक्षिके करून दाखवून उपस्थितांना योगाचे प्रशिक्षण दिले. कार्यक्रमात सामान्य रूग्णालय व परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाचे डॉक्टर्स, नर्स आणि कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

प्रास्ताविक क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत यांनी केले. संचालन श्रीमती वैशाली झाडे यांनी केले. तर आभार जयश्री मिसाळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्षेत्रीय लोकसंपर्क ब्युरो, वर्धाचे संतोष यादव, परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाचे कल्पना वलगावकर, नर्मदा गवई, अनिल टाले, वैशाली झाडे, पल्लवी बरडे, जयश्री मिसाळ, रेखा तडस, आरती कुडे, संगीता काकडे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# ‘माती’ काव्यसंग्रहास पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** लतिका चौधरी, दोंडाईचा, जि. धुळे यांच्या ‘माती’ ह्या मराठी काव्यसंग्रहास संकेत प्रकाशन, अकोला तर्फे उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख रक्कम, शॉल, श्रीफळ, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून लवकरच पुरस्कार वितरण होणार आहे. लतिका चौधरी यांचे हे दहावे पुस्तक असून यापूर्वीच्या संपूर्ण साहित्यास एकूण एक्कावन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या यशाबद्दल लतिका चौधरी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वाशिममध्ये आज आज महिला लोकशाही दिन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्यातील समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या तक्रारी व अडचणींची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी सुट्टी असेल तर त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही आयोजित करण्यात येतो.

या महिन्यात जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन हा मंगळवार, 17 मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आला आहे. असे प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आलोक अग्रहरी यांनी कळविले आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

|| श्री दत्तगुरु सु प्रसन्न ||
गौरी लक्ष्मी
वस्त्र भांडार व रेडिमेड
होलसेल भावात रिटेल विक्री
50% OFF
शुटींग, शर्टींग
साड्या
टॉप, फ्रॉक
फॅन्सी, मेन्स वेअर
किड्स वेअर

साई मंदिर रोड, भक्तनिवासच्या समोर, पाथरी
मो. 9764-618-618 /8329491616